| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ०४ था | बुधवार दिनांक ०४ मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## जाहिरातीतून एसटी कमविणार २५० कोटी रुपये.. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे प्रतिपादन



मुंबई (प्रतिनिधी)- : महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणारी 'लालपरी' आता केवळ प्रवाशांनाच नव्हे, तर महसूलवाढीलाही वेग देणार आहे. पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून एसटी महामंडळाला तब्बल २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या ३१० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहा.कामगार आयुक्त पल्लवी सहारे, तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाची २५१ आगारे आणि ६१० पेक्षा अधिक लहान-मोठी बसस्थानके राज्यभर पसरलेली आहेत. सुमारे १२ हजार बसेसच्या ताफ्याद्वारे दररोज ५० ते ५५ लाख प्रवाशांची ने-आण केली जाते. भविष्यात बससंख्या वाढल्यानंतर ही दैनंदिन प्रवासी संख्या १ कोटींपर्यंत जाईल. अशा व्यापक पोहोच असलेल्या माध्यमावर जाहिरात देणे म्हणजे उत्पादकांसाठी सुवर्णसंधीच आहे.

चांद्यापासून बांद्यापर्यंत, गावखेड्यांपासून महानगरांपर्यंत पोहोचणाऱ्या एसटीच्या प्रत्येक चाकासोबत आता महसुलाची नवी चक्रेही फिरणार आहेत. बसस्थानके, त्यांचा परिसर, बसेसच्या आतील व बाहेरील भाग तसेच उपलब्ध सर्व संसाधनांचा पुरेपुर वापर करून जाहिरात महसूल वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, पुढील पाच वर्षांसाठी २५० कोटी रुपयांहून अधिक महसूल देणारी निविदा स्वीकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सदयस्थितीत कार्यरत असलेले जाहिरात परवानाधारकांचा परवाना कालावधी समाप्त झाल्यानंतर जाहिरातीचे अधिकार नविन परवानाधारकांकडे जाणार आहेत. सध्या जाहिरातींद्वारे दरवर्षी सुमारे २२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. नव्या निविदेमुळे या उत्पन्नात तब्बल दुपटीपेक्षा जास्त वाढ होणार आहे. अशाप्रकारे तिकीट विक्रीव्यतिरिक्त विविध पर्यायी स्रोतांमधून उत्पन्न निर्माण झाले, तर एसटीला भविष्यात तोट्याच्या गर्तेत जाण्याची वेळ येणार नाही, असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

## धाराशिवमध्ये चोराखळीत भरपहाटे सशस्त्र दरोडा डोळ्यांत चटणी टाकून साडेनऊ लाखांचा मुद्देमाल लंपास

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील चोराखळी येथे रविवारी पहाटे एका नामांकित कलाकेंद्र संचालिकेच्या घरावर सशस्त्र दरोडा पडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सहा दरोडेखोरांनी पिस्तूल आणि सुऱ्याचा धाक दाखवून तब्बल ९ लाख ५१ हजार रुपयांचा ऐवज लुटला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी येरमाळा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे.

कलाकेंद्राच्या संचालिका निर्मला मोहन जाधव (वय ४५) या आपल्या कुटुंबासह चोराखळी येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ लगत असलेल्या कलाकेंद्राच्या दुसऱ्या मजल्यावर राहतात. रविवारी (दि. २) पहाटे साडेपाचच्या सुमारास, जेव्हा निर्मला जाधव आणि त्यांचे सहकारी बार्शीवरून परतले होते, तेव्हा तोंडाला कापड बांधलेले सहा अज्ञात इसम त्यांच्या घरात घुसले.

**जीवे मारण्याची धमकी**

घरात शिरताच आरोपींनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी शिवम गंगावणे याला जमिनीवर दाबून धरले, तर निर्मला जाधव यांच्या डोक्याला पिस्तूल आणि रेखा शिंदे यांच्या गळ्याला लोखंडी सुरा लावून जीवे मारण्याची धमकी दिली. आरडाओरड करू नये म्हणून आरोपींनी त्यांच्या डोळ्यात चटणी टाकली.

**एका आरोपीला महिलेने ओळखले**

दरोडेखोरांनी अंगावरील १२१ ग्रॅम सोन्याचे दागिने, चार महागडे मोबाईल आणि सीसीटीव्हीचा डीव्हीआर असा ९ लाख ५१ हजार रुपयांचा ऐवज लुटला. पीडित महिलेने यातील एक आरोपी सचिन उर्फ प्रशांत पवार (रा. तेरखेडा) असल्याचे ओळखले होते, मात्र जीवाला धोका असल्याने त्यांनी तात्काळ ही बाब उघड केली नाही.

मागील काही काळापासून आर्थिक व्यवहारावरून सचिन पवार आणि महादेव घुले यांच्याशी वाद सुरू होते आणि त्यांनी घरफोडीची धमकीही दिली होती, असेही त्यांनी नमूद केले.

पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## धाराशिव जिल्हा परिषदेत 'स्वीकृत' वादळ! पंचायत समितीत २०% एन्ट्री; कॅबिनेटचा निर्णय, गावोगावी नवी सत्तासमीकरणं!

**धाराशिव : (रामेश्वर डोंगरे )** राज्य मंत्रिमंडळाच्या ताज्या निर्णयामुळे धाराशिव जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये 'स्वीकृत सदस्य' नियुक्तीचा मार्ग मोकळा झाल्याने इच्छुकांमध्ये हालचालींना वेग आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषदेमध्ये एकूण सदस्यसंख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत २० टक्के स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. किमान ५ सदस्यांची नियुक्ती बंधनकारक राहणार असल्याने तालुका स्तरावर राजकीय गणितं बदलण्याची शक्यता आहे.

**धाराशिवमध्ये इच्छुकांची लगबग**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत थोडक्यात पराभूत झालेले उमेदवार, माजी पदाधिकारी आणि प्रभावी कार्यकर्ते आता स्वीकृत सदस्यपदासाठी जोरदार प्रयत्न करत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. काही ठिकाणी गुप्त बैठका आणि पक्षांतर्गत हालचाली वाढल्याची माहिती आहे.

**विरोधकांचा इशारा – ही लोकशाही की राजकीय पुनर्वसन?**

विरोधी गटांकडून या निर्णयावर टीका करण्यात येत असून मागच्या दाराने सत्तेची एन्ट्री असा आरोप होत आहे. तर सत्ताधारी गटाचा दावा आहे की विकास प्रक्रियेत तज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**धाराशिव जिल्ह्यात काय बदलणार?**

धाराशिव जिल्ह्यातील विविध पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेत या निर्णयामुळे सत्तेची समीकरणं बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी सत्ताधारी आणि विरोधी गटांमध्ये रणनीती आखण्यास सुरुवात झाली आहे.

**आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'मास्टरस्ट्रोक'?**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. धाराशिवमध्ये राजकीय तापमान वाढले असून, कोणाची लागणार लॉटरी आणि कोणाला बसणार धक्का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ग्रामीण सत्तेचा दरवाजा आता नव्या पद्धतीने उघडणार – धाराशिवच्या राजकारणात 'स्वीकृत' शक्तीचा उदय!

## येडेश्वरीच्या दर्शनाची वाट अवघड; दोन वर्षांपासून रस्तेकाम रखडल

येरमाळा (प्रतिनिधी)- कळंब तालुक्यातील येरमाळा गाव ते येडेश्वरी मंदिर रस्ता नव्याने करण्यात येत असून, हा रस्ता अतिशय निष्कृष्ट दर्जाचा करण्यात येत आहे. रस्ते काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांचे दिले होते. पण ते पायदळी तुडवत रस्ता अर्धवट ठेवल्याने रसत्यावरून जाणेही अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे भाविक वाहनधारकांसह ग्रामस्थांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

तुळजाभवानी मातेची धाकटी बहीण म्हणून संपूर्ण राज्यात परिचित असलेली आई येडेश्वरी देवी मंदिर जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांपैकी एक असून, महाराष्ट्रभर जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. या येडेश्वरी देवीचा चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सव दि. ३ एप्रिलपासून सुरू होत असून, येरमाळा गाव ते येडेश्वरी देवी मंदिर आणि मलकापूर ते श्री येडेश्वरी देवी मंदिर जिल्हा हद्द गेल्या १५ वर्षापासून या रस्त्याची दुर्दशा आहे. गेल्या दोन वर्षांपासून काम चालू आहे. पण दोन वर्षांपासून सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाचा दर्जा मात्र राम भरोसे असल्याने रस्त्यात खड्डा की खड्डा रस्ता हा नव्याने सुरू असलेल्या कामाची अशी स्थिती असल्याने टाकलेल्या खडीवर अपघात होऊन ग्रामस्थांसह भाविक दर्शनासाठी आले असता त्यांना गंभीर जखमी, अपंगत्व, वाटमारी अशा प्रकारच्या सामोरे जावे लागत आहे. आई श्री येडेश्वरी देवीची यात्रा काही दिवसावर येऊन ठेपली असली तरी दोन वर्षांपासून सुरू असलेले रस्ते काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. गतवर्षी झालेल्या यात्रा कमिटी आढावा बैठकीत पंधरा दिवसांत रस्ता पूर्ण करू असे सांगण्यात आले. परंतु तत्कालीन उपविभागीय अधिकारी संजय पाटील आणि तहसीलदार हेमंत ढोकळे यांनी सक्त ताकीद देऊन काम पूर्ण न केल्यास कारवाई करण्यात येईल, असा दम भरला होता. पण उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या आदेशाला न जुमानता काम अपूर्ण ठेवले. येरमाळा गाव ते येडेश्वरी मंदिर आणि मलकापूर मार्गासाठी पाच कोटी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत खर्च करण्यात येत असून, रस्त्याचे काम अपूर्ण, निष्कष्ट केले आहे. लवकरात लवकर काम पूर्ण व्हीवे अशी मागणी भाविकांतून होत आहे.

## क्राईम न्युज

### पेट्रोलपंपावरील नव्वद हजार चोरले

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी भरत हनुमंत सुर्यवंशी, वय ३२ वर्षे, रा. सांजा बायपास रोड शिवानगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे अण्णासाहेब पेट्रोलियम नावाच काक्रंबा येथील पेट्रोल पंपावरील कर्मचारी महेश रा. माळुंब्रा ता. तुळजापूर जि. धाराशिव याने पेट्रोल पंपावरील ९०,००० रोख रक्कम दि.२२.०२.२०२६ रोजी १७.०० वा. सु. चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी भरत सुर्यवंशी यांनी दि.०२.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### हायड्रोलीक ट्रॉलीची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी वेजिनाथ संभाजी शिंदे, वय ४२ वर्षे, रा. लोणी ता. परंडा जि. धाराशिव यांचे यांची अंदाजे ३५,००० किंमतीची हायड्रोलीक कृष्णाकंपनीची ट्रॉलीही दि. २३.०२.२०२६ रोजी फिर्यादीचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-वैजिनाथ शिंदे यांनी दि.०२.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मिथुन वय ३० वर्षे, रा. प्रतापनगर विजापूर रोड सोलापूर हे दि.२८.०२.२०२६ रोजी ईटकळ चौकात महा भंगार दुकानाचे बाजूस पत्र्याचे शेडसमोर अंदाजे ५,८०० किंमतीची ५६ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तसेच मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत सिद्राम उर्फ आप्पा वय ३७ वर्षे, रा. आष्टाकासार ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.०१.०३.२०२६ रोजी १३.३० वा. सु. आष्टाकासार गृरा. पं. चज्ञैकात शिवशक्ती ह्टेलच्या बाजूस मोकळ्या जागेत अंदाजे ४,५०० किंमतीची ४५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०१ मार्च रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १९१ कारवाया करुन १,७७,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाचे आवाहन परदेशातील नागरिकांसाठी सुरक्षा सूचना व हेल्पलाईन क्रमांक जाहीर

धाराशिव (जिमाका) मध्यपूर्व व परिसरातील काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी जारी केलेल्या सूचनांनुसार संबंधित देशांतील भारतीय दूतावासांनी तेथे वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांसाठी सुरक्षा डव्हायझरी जारी केली आहे.

या अनुषंगाने पॅलेस्टाईन (रामल्ला),कतार (दोहा),सौदी अरेबिया (रियाध),इस्रायल (तेल अवीव),इराण (तेहरान),इराक (बगदाद), कुवैत,बाहरीन,मस्कत,जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी सतर्क राहावे,अनावश्यक हालचाल टाळावी आणि स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशांतील भारतीय दूतावासांच्या २४७ हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधावा. दूतावास नियमितपणे परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक सूचना जारी करत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वतीने परदेशातील महाराष्ट्रातील नागरिकांनी शांतता व संयम राखावा,अधिकृत सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक असल्यास तात्काळ भारतीय दूतावासाशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत सतर्क असून केंद्र शासन व संबंधित दूतावासांशी समन्वय ठेवून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

आपत्कालीन संपर्क तपशील
SEOC (24X7)
राज्य आपत्कालीन परिस्थिती किंवा परदेशातील व्यक्तींच्या सुरक्षेबाबत माहिती देण्यासाठी नागरिकांनी खालील डएजउ क्रमांकावर संपर्क साधावा:
टोल फ्री क्र.१०७७
फोन नं. +९१-९३२१५८७१४३
कार्यालयीन क्र.०२२-२२०२७९९०
ई-मेल आयडी: controlroomgov.in

संबंधित देशांतील भारतीय दूतावासांचे संपर्क तपशील

रामल्लाह (पॅलेस्टाईन)
फोन: +९७०५९२९१६४१८
ईमेल: repofficemea.gov.in / cons.ramallahmea.gov.in

दोहा (कतार)
फोन: ००९७४-५५६४७५०२
ईमेल: cons.dohamea.gov.in

रियाध (सौदी अरेबिया)
फोन: ००-९६६-११-४८८४६९७
WhatsApp: 00-967-542126748
टोल फ्री: ८०० २४७ १२३४
ईमेल: cw.riyadhmea.gov.in

तेल अवीव (इस्रायल)
फोन: +९७२-५४-७५२०७११ / +९७२-५४-२४२८३७८
ईमेल: conal.telavivmea.gov.in

तेहरान (इराण)
फोन: +९८९१२८१०९११५ / +९८९१२८१०९१०९ / +९८९१२८१०९१०२ / +९८९९३२१७९३५९

अबू धाबी (संयुक्त अरब अमिरात)
टोल फ्री: ८००-४६३४२
WhatsApp: +971543090571
ईमेल: pbsk.dubaimea.gov.in / ca.abudhabimea.gov.in

कुवैत
फोन: ९६५६५५०१९४६
ईमेल: लेर्ग्पिळीं.ज्ञुीरळींशर.सीं.ळप

बाहरीन
फोन: ००९७३-३९४१८०७१

मस्कत
टोल फ्री: ८००७१२३४
WhatsApp: +96898282270
ईमेल: cw.muscatmea.gov.in / cons.muscatmea.gov.in

जॉर्डन
फोन: ००९६२-७७० ४२२ २७६

बगदाद (इराक)
फोन: +९६४ ७७१ ६५१ ११८५ / +९६४ ७७०४४४४८९९
वेबसाइट: coibaghdad.gov.in
ईमेल: cons.baghdadmea.gov.in / cons1.baghdadmea.gov.in / pol.baghdadmea.gov.in Ago AmhoV.

परदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी राहावे आणि अनावश्यक हालचाल टाळावी.भारतीय दूतावास/कॉन्सुलेटच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.आपले लोकेशन व स्थिती कुटुंबियांना सतत कळवावी.मोबाईल चार्ज ठेवावा व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत.सोशल मीडियावर अफवा, अप्रमाणित संदेश किंवा चुकीची माहिती पसरवू नये.स्थानिक भारतीय दूतावासाकडे नोंदणी करणे अत्यावश्यक आहे.

**जिल्ह्यातील नागरिकांसाठी सूचना**

उपरोक्त देशांमध्ये आपले नातेवाईक किंवा जवळच्या व्यक्ती अडकून पडलेले असतील तर त्यांची माहिती धाराशिव प्रशासनास खालील क्रमांकांवर संपर्क साधून द्यावी. अडकलेल्या नातेवाईकांशी संपर्क झाला असल्यास त्यांना कोणत्या मदतीची आवश्यकता आहे याबाबत जिल्हा प्रशासनास कळवावे.ज्या नातेवाईकांशी संपर्क होऊ शकत नाही, त्यांची माहिती प्रशासनास सविस्तरपणे देण्यात यावी,असे आवाहन करण्यात येत आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष: ०२४७२- २२४३६६, ०२४७२-२२५६१८.
टोल फ्री क्रमांक :१०७७
धाराशिव पोलीस नियंत्रण कक्ष: ०२४७२-२२२९००, ०२४७२-२२२७००
निवासी उपजिल्हाधिकारी, धाराशिव: ७५८८९३८६८६
तहसीलदार तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी,**धाराशिव:** ९४२३३३९१९२
उपविभागीय अधिकारी,**धाराशिव:** ७०८३६६३१३९
उपविभागीय अधिकारी,**उमरगा:** ९८५०८९७०४२
उपविभागीय अधिकारी,**कळंब:** ९९२२४४७८१२
उपविभागीय अधिकारी,**भूम:** ९५६६०९६६९१
तहसीलदार धाराशिव: ९६५७५७६७१४
तहसीलदार **तुळजापूर** : ७७७६८८९९९९
तहसीलदार **उमरगा** : ९४२२४६९०१३
तहसीलदार **लोहारा** : ७८७५२४३८३४
तहसीलदार **कळंब** : ९८८१७४५५७७
तहसीलदार **वाशी:** ९०९६२५५७३७
तहसीलदार **भूम:** ९८२३७२२२७४
तहसीलदार **परंडा:** ८२०८५१३६५६

वरील क्रमांकांवर संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,धाराशिव यांनी दिली.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## युद्धामुळे परिणाम शक्य

युद्ध म्हटले की, त्याचा परिणात सर्वांना भोगावा लागतो. त्याच प्रमाणे अमेरिकेचे ट्रम्प यांचा धुर्तपना नाही तर जागतिक संकट आहे. लहरीपनाचा कळस आहे. काही झाले तरी आता जगाला या बाबत चिंता व्यक्त करावी लागेल. त्याच प्रमाणे परिणाम भोगावे लागतील असे चित्र सध्याला दिसून येत आहेत. मागील काही दिवसांपासून मध्य पूर्वेत तणाव सुरू आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ले सुरू केले आहेत, या हल्ल्यांना इराणनेही प्रत्युत्तर दिले आहे. अमेरिकेचे लष्करी तळ असणाऱ्या देशात इराणने हल्ले केले आहेत. दरम्यान, आता या युद्धाचा परिणाम जगावर होण्यास सुरुवात झाली आहे. अटलांटिक बेसिनमधील एलएनजी टँकरच्या भाड्यात मोठी वाढ झाली आहे. जहाजमालक आणि दलाल आता या टँकरसाठी दररोज २००,००० डॉलर्सपेक्षा जास्त दराची मागणी करत आहेत, जे २४ तासांपूर्वी मागत असलेल्या दरापेक्षा जवळजवळ दुप्पट आहे. ब्लूमबर्गच्या मते, इराणसोबत सुरू असलेल्या संघर्षाच्या वाढत्या वाढीमुळे कतारने एलएनजी उत्पादन थांबवल्यानंतर भाड्यात ही वाढ झाली आहे. या घडामोडीमुळे या प्रदेशात तणाव आणखी वाढला आहे. इतक्या उच्च दरांवर अद्याप कोणताही करार झालेला नाही. सोमवार सकाळी शिपिंग फर्म स्पार्क कमोडिटीजने अंदाजित केलेल्या एलएनजी टँकरच्या ६१,५०० डॉलरच्या शेवटच्या दरापेक्षा देऊ केलेले दर किमान तीन पट जास्त आहेत. ही मोठी वाढ बाजारातील अस्थिरता आणि अनिश्चितता दर्शवते. कतार आणि अबू धाबीसारख्या ठिकाणी दीर्घकाळ उत्पादन कपात केली जात नाही तोपर्यंत टँकरच्या दरांमध्ये झालेली ही लक्षणीय वाढ प्रत्यक्ष व्यवहारात रूपांतरित होण्याची शक्यता कमी आहे, असा विश्वास प्रेसिजन एलएनजी कन्सल्टिंग एलएलसीचे सल्लागार रिचर्ड प्रॅट यांनी व्यक्त केला. अमेरिकेपासून आशियापर्यंत जहाजांना प्रवास करण्यासाठी लागणारे अतिरिक्त अंतर देखील भाड्यावर दबाव आणण्यात भूमिका बजावू शकते, असेही त्यांनी सांगितले. हल्ल्यांच्या वाढत्या धोक्यामुळे, शिपिंग कंपन्यांनी आखाती आणि पश्चिम आशियाई देशांमध्ये जाणाऱ्या आणि येणाऱ्या वस्तूंवर प्रति कंटेनर २,००० ते ४,००० डॉलर पर्यंतचे आपत्कालीन संघर्ष शुल्क आकारले आहे असे वृत्त आहे. हे शुल्क २ मार्चपासून लागू झाले. शिपिंग कंपन्यांनी सांगितले की, शिपिंग बुकिंगवर आपत्कालीन संघर्ष शुल्क लागू होतील. इराक, बहरीन, कुवेत, येमेन, कतार, ओमान, संयुक्त अरब अमिराती (यूएई), सौदी अरेबिया, जॉर्डन, इजिप्त (ऐन सोखना बंदर), जिबूती, सुदान आणि एरिट्रिया या बंदरांवर भारतीय निर्यात लोड करण्यासाठी किंवा आयात करण्यासाठी आपत्कालीन शुल्क लागू होतील. इंधनाच्या दरात वाढ होणार आहे. काही झाले तरी आता भारतीयांनी जपून पावले उचलण्याची गरज आहे. आखाती युद्ध असले तरी अमेरिका हा मोठा निर्णय घेवून आपली दहशद इस्लामिक राष्ट्रावर बसविण्याचा प्रयत्न करणार आहे. त्याच प्रमाणे आज जे मर्यादित दिसणारे युद्धाचा विपरीत परिणाम हा मोठा आगामी काळात होण्याची आहे. मुळात युद्ध सध्याच्या परिस्थितीत कोणत्याही देशाला परवडणारे आहे. असे जरी असले तरी प्रत्यक्षात काहींदेशात खुमखमी निर्माण झाली आहे. इस्लामिक देशात रमजानच्या महिण्यात युद्धजन्य स्थिती निर्माण झाली आहे. ईस्लामिक देशातील मौलवी आदि धर्मगुरूं कोठे आहेत? त्यांची भुमिका सध्याच्या परिस्थितीत महत्त्वाची आहे. त्यांचे मत आवश्यक आहे. आलिकडे युद्ध संपल्यावर मोठा परिणाम होतो तो घातक असतो. त्याबाबत मुकाबला कशाप्रकारे करावयाचा हा मोठा प्रश्न समोर उभा राहातो. भारताची या बाबत भुमिका ही सावध आहे. भारत काही प्रमाणात स्वयंपुर्ण आहे. केवळ इंधनाच्या बाबतीत परावलंबि असला तरी पर्याय ठेवून वाटचाल करीत आहे. इंधनाचा तुटवडा भासणार आहे. त्यामुळे काळजी घेतली पाहिजे. इंधनाचा वापर कसा कमी करता येईल याचा विचार करावा लागेल. इंधनाची बचत करावी लागेलच. त्याबरोबर इंधनाला पर्याय गेल्या दहा वर्षापासून भारत करीत आहे. ईलेक्ट्रिक गाड्या, सौर ऊर्जाचा वापरास प्रवृत्त केले जात आहे. यात मोठे यशही भारताला येत आहे. स्वावलंबन भारताची ओढे आहे ती यशस्वी होताना दिसून येत आहे. आज जरी हे युद्ध मामुली वाटत असले तरी याचा परिणाम मोठा होणार आहे. यातून जो वाचेल तो आगामी काळात महासत्तावादी होणार आहे. इंधनाच्या जोरावर आखाती देशात अंधाधुंधपना माजला आहे. मोठ्या प्रमाणात धार्मिकता विसरली जात आहे. देखावा अधिक दिसून येत आहे. कालांतराने मस्तीत असणाऱ्यादेशाची नशा कालांतराने उतरली आहे. मुळात युद्धाचा भडका हा अनेक दिवसापासून चालत आलेल्या विविध प्रसंगामुळे उडाला आहे. अमेरिकेने पोसलेला लादेनला शेवटी अमेरिकेनेचे खात्मा केला आहे. आता पर्यंत वापर करा व काम संपल्यावर समाप्त करा अशा चालीचा अमेरिका आहे. ज्या-ज्या देशात इंधनाचा साठा आहे. हे धन आहे त्याकडे अमेरिकेचे लक्ष गेलेले आहे. त्याच प्रमाणे आज पर्यंत ईस्लामिक राष्ट्र जे जगात बहुसंख्येने आहेत ते अमेरिकेचे गुलाम दिसून आलेले आहे. आज अमेरिकाविरोधात कोणीही आवाज उठवित नाहीत. त्यामुळे जगात या युद्धाचा परिणाम अधिक होवू नये यासाठी सर्वांनी युद्ध कसे थांबेल याचा विचार केला पाहिजे. सतत संघर्ष व वाढता टॅरिफची धडकीमुळे अमेरिकेवर नाराजगी आहे. आता तर युद्धाचा भडका उडाला आहे. त्यामुळे परिणाम होणार आहे. त्यापुर्वी भारताने इंधनाचा वापर काटसरीने करावा. गॅसचा वापर कमीतकमी करावा. सध्याला चीनने आपली भुमिका जाहिर केली नाही. भारत सावध पावले उचलित आहे. भारतीयांना काही दिवसापुर्वीच विपरीत घडेल असे वाटत होते. त्यामुळे भारताची भुमिका गुलदस्त्यात दिसून येत आहे. आता भारतीय नागरिकांनी सावध होवून ज्या बाबी परावलंबि आहेत. सर्वात इंधनाची बाब आहे याबाबत विचार करून पावले उचलली पाहिजेत. भारताने अजून कोणाताही पक्ष स्विकारला नाही. जे यात भारतीय नागरिक आडकले आहेत त्याना मायदेशी आणण्याचा विचार होत आहे. त्यामुळे भारतीयांनी इंधनाचा वापर काटसरीने करावा. एक दिवस पुर्ण इंधन वापरू नये. देशासाठी इंधनाची मोठी आवश्यकता भासते. त्यामुळे भारतीयांनी सावध झाले पाहिजे. याचा परिणाम होणार आहे, तो अधिक जाणवू नये याची दक्षता घ्यावी लागेल.

## महिलांनी प्रशिक्षीत होत, शासकीय योजनांचा लाभ घेऊन लघुउद्योग उभारुन स्वावलंबी व्हावे - सोमनाथ स्वामी डिगोळकर

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय ग्रामविकास मंत्रालय व भारतीय स्टेट बँक यांच्या वतीने चालणाऱ्या ग्रामीण रोजगार स्वयंरोजगार,प्रशिक्षण संस्था लातूर मार्फत सुसक्षित बेकार महिला व पुरुष वर्गांना विविध उघोगाचे व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जाते त्याचा लाभ घेऊन केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा महिला व मुलींनी विविध शासकीय योजनेच्या माध्यमातून कर्ज रूपातून लघुउद्योग, व्यापार उभारून स्वावलंबी व्हावे व उद्योगात मोठी गरुडझेप घेत आर्थिक उन्नती साधावी असे आवाहन शिवसेनेचे निलंगा विधानसभा प्रमुख व शासनमान्य पत्रकार सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी येथे आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना केले.

यावेळी.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री कराळे डी पी, परिक्षक , सौ. स्वप्ना जामदार पार्लर परीक्षिका तसेच पार्लर बॅच चे बॅच कॉर्डिनेटर श्री सुधाकर सुतार हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात श्री.सुधाकर सुतार यांनी एस बी आय आरसेटी लातूर येथे होणाऱ्या विविध प्रशिक्षणाची माहिती दिली व नोकर न होता मालक बना असे मार्गदर्शन यावेळी केले तसेच सौ. स्वप्ना मॅडम यांनी महिलाना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व अध्यक्षीय समारोप श्री कराळे यांनी केला त्याच बरोबर कार्यक्रमाचे सूत्रसंघालन कु.स्वाती मुळे, ब्युटी पार्लर प्रशिक्षणार्थी हिने केले तर यावेळी प्रशिक्षणार्थी कु. रूपा गिरी व सौ.शीतल सगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.




पुढे बोलताना सोमनाथ स्वामी डिगोळकर म्हणाले की महिला वर्गांच्या बळकटीकरण व सक्षमीकरणासाठी ,आर्थिक प्रगतीसाठी केंद्र व राज्य शासन मोठ्या गतीने प्रयत्न करीत असून महिला पुरुषांबरोबर प्रत्येक क्षेत्रात,उद्योग, व्यवसायात पुढे यावे, आर्थिक पाठबळ मिळावे, आपला कौटुंबिक संसाराचा गाडा हाकत आर्थिक पाठबळ देण्यासाठी व आपला व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविण्यासाठी पुढे येत आहेत. शासन व प्रशासनाच्या वतीने महिला उन्नतीसाठी अनेक उपक्रम,योजना राबविण्यात येत आहेत..त्याचाच एक भाग हा स्वयंरोजगार व प्रशिक्षण संस्थेच्या मार्फत चालणारा उपक्रम असून या संस्थेअंतर्गत लातूर येथे सुसक्षितबेकार पुरुष,महिला व मुलींसाठी व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते व व्यक्तीमत्व विकास पण साधण्यासाठी सखोल मार्गदर्शन केले जाते, व्यापार कसा करावा,उद्योग व्यवसाय कसा उभा करावा त्यातून आर्थिक प्रगती कशी साधावी या संदर्भातही प्रशिक्षण दिले जात असल्याने आजपर्यंत येथील या सर्व बाबींचा मोठा लाभ अनेक महिला व पुरुष वर्गाना झालेला असून त्यांनी आपल्या जीवनात गतीने प्रगती साधली आहे.. खरे तर ग्रामीण भागातील जनतेला या महागाईच्या युगात मोफत प्रशिक्षण मिळणे ही अवघड बाब झालेली असून या ज्वलंत गोष्टींची गरज ओळखून केंद्र सरकारने हे जनहिताचे अचुक पाऊल उचललेले दिसत आहे..या ठिकाणी मोफत उद्योगाचे प्रशिक्षण सोबत राहण्याची, जेवणाची नाश्त्याची सर्व व्यवस्था सदर संस्थेच्या वतीने केले जाते, याचा लाभ ग्रामीण भागातील महिला व तरुणांनी घेऊन आपल्या जिवनात उद्योग , व्यापार क्रांती घडवून यशस्वी होत, आयुष्यात मोठी आर्थिक प्रगती साधावी असेही शेवटी बोलतांना नमूद केले..

शेवटी आभार प्रदर्शन राहुल जाधव फॅकल्टी यांनी केले..

## बहुआयामी प्रज्ञेचा महामेरू: डॉ. जनार्दन माधवराव वाघमारे एक 'कृतिशील' महामानव आणि राष्ट्रग्रामचे निर्माते

महाराष्ट्राच्या शैक्षणिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्रात विद्वत्ता, तत्त्वनिष्ठा आणि लोकाभिमुखतेचा त्रिवेणी संगम साकार करणारे ऋषितुल्य व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. जनार्दन माधवराव वाघमारे. वयाच्या ९१ व्या वर्षी, २ मार्च २०२६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आणि एका तेजस्वी युगाचा अस्त झाला. त्यांच्या निधनाने लातूरच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या बौद्धिक विश्वात एक न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ तथा राज्यसभेचे माजी खासदार म्हणून त्यांनी केवळ संस्थांचे नेतृत्व केले नाही, तर विचारांची पेरणी केली. निग्रो साहित्याचे भाष्यकार, दलित-पुरोगामी साहित्य चळवळीचे अभ्यासक म्हणून त्यांची ओळख देशभर पसरली होती. त्यांनी मराठी तसेच इंग्रजी भाषेत विपुल आणि दर्जेदार ग्रंथसंपदा निर्माण केली.



**व्यक्तिगत आणि शैक्षणिक पार्श्वभूमी**

११ नोव्हेंबर १९३४ रोजी जन्मलेल्या डॉ. वाघमारे यांनी आपल्या जिद्दी, अभ्यासू वृत्ती आणि कष्टांच्या जोरावर उच्च शिक्षणाची शिखरे सर केली. त्यांनी उस्मानिया विद्यापीठ येथून बी.ए., पुणे विद्यापीठ (सध्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) येथून एम.ए. पदवी संपादन केली. पुढे पीएच.डी., एल.एल.बी. आणि एल.एल.एम. या पदव्याही त्यांनी मिळवल्या. त्यांच्या प्रदीर्घ आणि भरीव कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'डी.लिट.' ही मानद पदवी प्रदान करण्यात आली.

शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, विचारवंत आणि राजकारणी अशी बहुआयामी ओळख असलेले हे व्यक्तिमत्व केवळ पदव्यांपुरते मर्यादित नव्हते; त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनवले.

**'लातूर पॅटर्न'चे शिल्पकार**

डॉ. वाघमारे यांची सर्वाधिक गाजलेली ओळख म्हणजे 'लातूर पॅटर्न'चे जनक म्हणून. मराठवाड्यातील ग्रामीण आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी त्यांनी अभ्यास, शिस्त, नियोजन आणि गुणवत्तेचा संगम घडवून आणला.

राजर्षी शाहू महाविद्यालय येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असताना त्यांनी केवळ शैक्षणिक निकाल उंचावले नाहीत, तर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्पर्धात्मक वृत्ती आणि यशाची भूक निर्माण केली. आज महाराष्ट्रात आणि देशात विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले हजारो डॉक्टर, इंजिनिअर्स, प्रशासकीय अधिकारी आणि व्यावसायिक हे या शैक्षणिक क्रांतीचे फलित आहेत.

**विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू**

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ या विद्यापीठाचे ते संस्थापक कुलगुरू होते. एका नव्या विद्यापीठाचा शैक्षणिक आणि प्रशासकीय पाया रचण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी पार पाडले. दूरदृष्टी, काटेकोर नियोजन आणि शैक्षणिक बांधिलकी यांच्या बळावर त्यांनी विद्यापीठाला अल्पावधीत प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

विद्यापीठ उभारणी ही केवळ इमारती उभारण्याची प्रक्रिया नसून विचारांची आणि मूल्यांची पेरणी असते, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

राजकीय कारकीर्द: लोकनियुक्त नगराध्यक्ष ते राज्यसभा सदस्य

राजकारण हे समाजकारणाचे साधन असावे, या भूमिकेवर त्यांची ठाम श्रद्धा होती. लातूरचे पहिले 'लोकनियुक्त नगराध्यक्ष' म्हणून त्यांनी 'लातूर व्हिजन'चा आराखडा राबवून शहराच्या विकासाला गती दिली. त्यांच्या कार्यकाळात लातूरला 'संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान'मध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

पुढे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांनी राज्यसभा सदस्य म्हणून काम केले. संसदेत त्यांनी शिक्षण, सामाजिक न्याय आणि मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न अभ्यासपूर्ण आणि संयत शैलीत मांडले. त्यांच्या विद्वत्तेचा आदर सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूंनी केला जात असे.

**साहित्यिक आणि वैचारिक योगदान**

इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक म्हणून त्यांनी जागतिक साहित्याचा गाढा अभ्यास केला. विशेषतः 'निग्रो साहित्य', दलित साहित्य आणि पुरोगामी चळवळींवर त्यांनी सखोल लेखन केले. अमेरिकन निग्रो साहित्याचा परिचय मराठी वाचकांना करून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता.

त्यांनी 'अमेरिकन निग्रो : साहित्य आणि संस्कृती', 'आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव', 'चिंतन एका कुलगुरूचे', 'चिंतनयात्रा', 'दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी', 'परिवर्तन : संकल्पना, वेध आणि वास्तव', 'प्राथमिक शिक्षण : यशापयश आणि भवितव्य', 'बदलते शिक्षण : स्वरूप आणि समस्या', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जातिअंताचा लढा', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतिकारक शैक्षणिक विचार आणि कार्य', 'महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण', 'माझे मूळ : माझे कूळ', 'लोकशाही आणि शिक्षण' अशी अनेक दर्जेदार ग्रंथसंपदा निर्माण केली.

त्यांच्या लेखणीतून सामाजिक समता, परिवर्तनवादी विचार आणि बौद्धिक प्रगल्भता यांचा प्रभावी आविष्कार झाला.

**लातूर भूकंप आणि 'राष्ट्रग्राम' संकल्पना**

१९९३ च्या भीषण लातूर-उस्मानाबाद भूकंपानंतर त्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या () विद्यार्थ्यांना सोबत घेत चलबुर्गा गाव दत्तक घेतले.

जातीविरहित समाजरचना, श्रमदानातून राष्ट्रनिर्मिती आणि ग्रामस्थांच्या सहभागातून उभारलेले पुनर्वसन या कार्याला खऱ्या अर्थाने 'राष्ट्रग्राम' निर्मिती म्हणता येईल. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे, हा संदेश त्यांनी भाषणातून नाही तर कृतीतून दिला.

**नामांतर लढा आणि वैचारिक भूमिका**

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावर त्यांनी संयमी पण ठाम भूमिका घेतली. शरद पवार यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी समन्वयाची भूमिका बजावली.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' हे नाव समाजात तेढ निर्माण न करता सार्थ ठरेल, यासाठी त्यांनी वैचारिक पाया रचला. नव्या विद्यापीठाच्या निर्मितीत ते विश्वासू 'वैचारिक शिलेदार' म्हणून ओळखले गेले.

**यशवंतरावांच्या 'सुसंस्कृतते'ची व्याख्या**

पुण्याला शिक्षणासाठी असताना यशवंतराव चव्हाण यांचाशी त्यांचा संपर्क आला होता. तेंव्हा पासून ते त्यांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित होते. तते कराड येथील व्याख्यानमालेत बोलताना त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या विधानाचा संदर्भ दिला की

''ज्ञानेश्वरांच्या रूपाने संतप्रवृत्ती, शिवरायांच्या रूपाने पराक्रम, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या रूपाने स्वार्थत्याग आणि लोकमान्य टिळकांच्या रूपाने विद्वत्ता व राजकारण महाराष्ट्रापुढे उभे आहे.''

या विधानाचा विस्तार करत डॉ. वाघमारे म्हणाले ''सुसंस्कृतता ही महाराष्ट्राची पाचवी प्रवृत्ती आहे आणि यशवंतराव चव्हाण तिचे प्रतीक होते.''

**राजकारणाकडे विधायक दृष्टिकोन**

अनेक विचारवंत राजकारणाला नकारात्मकतेने पाहतात; पण डॉ. वाघमारे यांचा विश्वास होता की राजकारण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. सत्पात्री लोकांच्या हातात सत्ता असेल तर 'सत्कार्य' घडू शकते, हा त्यांचा ठाम दृष्टिकोन होता.

ते सक्रिय राजकारणात राहिले; पण त्यांच्या वैचारिक उंचीला तडा जाऊ दिला नाही.

डॉ. जनार्दन वाघमारे हे केवळ एका पक्षाचे किंवा जिल्ह्याचे नेते नव्हते; ते महाराष्ट्राचे 'बौद्धिक वैभव' होते. शिक्षण, साहित्य, राजकारण आणि समाजकारण या चारही क्षेत्रांत त्यांनी उभारलेले कार्य प्रेरणेचे दीपस्तंभ आहे.

त्यांच्या जाण्याने एक ऋषितुल्य गुरुजी, तत्त्वनिष्ठ लोकनेता आणि विचारवंत काळाच्या पडद्याआड गेले असले, तरी त्यांनी रुजवलेली शैक्षणिक परंपरा, दिलेली वैचारिक दिशा आणि उभे केलेले संस्थात्मक वारसे येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतील.

समारोप करताना महात्मा ज्योतिराव फुले यांचे शब्द आठवतात

''विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली.''

डॉ. वाघमारे यांनी आयुष्यभर 'विद्या'चा दीप प्रज्वलित ठेवत समाजाला 'नीती' आणि 'गती' देण्याचे कार्य केले. म्हणूनच ते केवळ एक व्यक्ती नव्हते, तर एक विचार होते आणि विचार कधीच मरत नाहीत.

**ॲड. निशांत वाघमारे**
**मो. न. ७७९८३२५५५५**

## वारकऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध : माजी मंत्री आमदार अमित देशमुख



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील खंडापूर येथे वारकऱ्यांचा जणू कुंभमेळाच भरला आहे. वारकरी संप्रदायाचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते प्रभावीपणे सोडवण्यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत. वारकऱ्यांनी आम्हाला सदैव सेवा करण्याची संधी द्यावी,'' असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

लातूर शहरानजीकच्या खंडापूर परिसरात आयोजित भव्य, दिव्य सत्संग सोहळ्यास आमदार अमित देशमुख यांनी रविवार, दि. १ मार्च रोजी सायंकाळी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज कदम (छोटे माऊली) यांचे कीर्तन श्रवण करून त्यांचा यथोचित सत्कार केला.

श्री संत नामदेव महाराज षष्ठशतकोत्तर अमृत महोत्सवी संजीवन समाधी सांगता सोहळा, श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर जन्मोत्सव सांगता महोत्सव आणि श्री जगद्गुरु तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठ गमन सोहळ्याच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. खंडापूर परिसरात २२ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत हा वारकऱ्यांचा सत्संग सोहळा संपन्न होत आहे.

यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, श्रीगुरु माणिक महाराज देहूकर, श्रीगुरु रामदास महाराज मोरे देहूकर,बाबा महाराज काडगावकर, प्रभू महाराज माळी, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव,लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, ट्वेंटीवन शुगरचे व्हॉइस चेअरमन विजय देशमुख सोनाली थोरमोठे पाटील आदी उपस्थित होते.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर तालुक्यातील खंडापूर येथे वारकऱ्यांचा कुंभमेळा होतोय हभप ज्ञानेश्वर माऊली महाराज कदम (छोटे माऊली) यांचे हार्दिक स्वागत करतो वारकऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते सोडवण्याचा आम्ही प्रयत्न करू वारकऱ्यांनीही आम्हाला सेवा करण्याची संधी द्यावी असे त्यांनी म्हटले आहे.

यावेळी दत्ता टेकाळे, गुरुनाथ गवळी, अक्षय देशमुख, शाम बरुरे, तात्यासाहेब देशमुख, विकास देशमुख, बाळासाहेब कदम, सतीश साळुंखे, विकास कांबळे, चंद्रकांत अरडले, संजय पाटील खंडापूरकर, बालाजी वाघमारे, विष्णू धायगुडे, पंडितराव लखनगिरे, रवींद्र मुहकुळे, तुषार लखनगिरे, महेश चामे, परमेश्वर मांडवे, माऊली सुडे, चंद्रकांत टेकाळे, हनुमंत पवार, वीरसेन भोसले, नरेश पवार आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रण कक्ष किंवा माझ्या कार्यालयात संपर्क साधावा : अमित देशमुख यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :**मध्यपूर्व आशियातीळ युद्धजन्य देशात अडकलेल्या लातूर जिल्ह्यातील नागरिकांच्या नातेवाईकांनी आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील किंवा माझ्या कार्यालयातील खाली दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले असून या ठिकाणी त्यांना आवश्यक ते सहकार्य आणि मार्गदर्शन केले जाईल असे त्यांनी म्हटले आहे.

आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या अनुषंगाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, युद्धाची परिस्थिती निर्माण झालेल्या देशात वास्तव्यास असलेल्या लातूर जिल्हा तसेच महाराष्ट्रातील नागरिकांच्या नातेवाईकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. या संदर्भाने आज लातूर जिल्हा अधिकाऱ्यांशी चर्चा केली, महाराष्ट्र तसेच देशाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या वतीने या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर भारतीय नागरिकांसाठी सुरक्षा डव्हायझरी जारी केली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली आहे.

आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून जारी केलेल्या सूचनांनुसार, युद्धजन्य परिस्थिती असलेल्या पॅलेस्टाईन (रामल्ला), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद), कुवैत, बाहरीन, मस्कत, जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी) या देशात वास्तव्यास भारतीय नागरिकांनी घाबरून न जाता दक्ष राहण्याचा सूचना तेथील भारतीय दूतावासाकडून देण्यात आले आहेत. या दुतावासामध्ये २४ तास हेल्पलाइन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

युद्धजन्य स्थिती असलेल्या देशातील दुतावास आणि तेथील हेल्पलाइन

संपर्काची माहिती पुढीलप्रमाणे आहे. रामल्लाह पॅलेस्टाईन फोन:

+९७०५९२९१६४१८ । ईमेल: repofficemea.gov.in

दोहा (कतार): फोन: ००९७४-५५६४७५०२ । ईमेल: cons.dohamea.gov.in

रियाध (सौदी अरेबिया): फोन: ००-९६६-११-४८८४६९७ । Whats-pp: ००-९६६-५४२१२६७४८ । टोल फ्री: ८०० २४७ १२३४

तेलअवीव (इस्रायल): फोन: +९७२-५४-७५२०७११ /+९७२-५४-२४२८३७८

तेहरान (इराण): फोन: +९८९१२८१०९११५ / +९८९१२८१०९१०९ / +९८९१२८१०९१०२

अबूधाबी (ण-ए): टोल फ्री: ८००-४६३४२ । Whats-pp: +९७१५४३०९०५७१

कुवैत : फोन: +९६५६५५०१९४६ । ईमेल: community.kuwaitmea.gov.in

बाहरीन : फोन: ००९७३-३९४१८०७१

मस्कत : टोल फ्री: ८००७१२३४ । Whats-pp: +९६८९८२८२२७०

जॉर्डन : फोन: ००९६२-७७० ४२२ २७६

बगदाद (इराक): फोन: +९६४ ७७१ ६५१ ११८५ / +९६४ ७७०४४४ ४८९९

लातूर जिल्ह्यातील नागरिक किंवा त्यांच्या नातेवाईक त्या युद्धजन्यदेशात अडकले असतील, आणि त्यांना काही समस्या असतील यासंदर्भात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातच्या नियंत्रण कक्षातील दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२२०२०४ यावर संपर्क साधावयाचा आहे. या ठिकाणी संपर्क साधण्यात काही अडचण येत असेल तर अशा नागरिकांनी माझ्या संपर्क कार्यालयातील ०२३८२-२२३९०१ या क्रमांकावर संपर्क साधावा असे मी आवाहन आमदार अमित देशमुख यांनी या प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनाच्या शेवटी केले आहे.

# जे घडलेचि नव्हते

सत्ता मिळवण्याच्या हेतूने इतरांना भ्रष्ट ठरवण्यासाठी भाजप अपप्रचाराचे रान उठवते. २०१४ मध्ये ते दिसले. आता पुन्हा त्याचा प्रत्यय आला; मात्र न्यायालयाने योग्य प्रक्रियेची बूज राखली आहे.

दिल्लीच्या केजरीवाल सरकारच्या काळात उत्पादन शुल्क धोरण तयार करताना कोणताही गैरव्यवहार झालेला नसल्याचा निर्वाळा दिल्लीच्या विशेष न्यायालयाने दिला आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, त्यांचे सहकारी मनीष सिसोदिया आणि इतर २१ जणांना न्यायालयाने निर्दोष ठरवले आहे. 'हे धोरण आखण्यामागे 'कारस्थान' नव्हते किंवा त्यामागे गुन्हेगारी उद्देशही नव्हता' असे स्पष्टपणे नमूद करताना केंद्रीय गुप्तचर विभागावर (सीबीआय) न्यायालयाने कडक ताशेरे ओढले आहेत. ५९८ पानांच्या या निकालपत्राने कायदेशीर प्रक्रिया आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचे महत्त्व अधोरेखित केल्याने ते न्यायालयीन इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरले आहे. सीबीआयने दाखल केलेल्या हजारो पानांच्या आरोपपत्रात साधार साक्षी नसल्याने अनेक उणिवा आहेत, स्वीकारण्याजोगे



पुरावे नाहीत हे न्यायालयाने दाखवून दिले आहे. कायदेशीररीत्या मान्य होईल असा पुरावा नसताना आरोपींना गुन्हेगारी खटल्याच्या जाचास सामोरे जाण्यास भाग पाडणे हा न्याय व्यवस्थेचा अवमान आहे आणि गुन्हेगारी कायद्याचा गैरवापर आहे, अशा शब्दांत न्यायालयाने सीबीआयची कान उघाडणी केली आहे. केजरीवाल यांच्या विरुद्धचे हे प्रकरण पूर्णपणे राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे प्रथमपासून दिसत होते.

**कारस्थान कोणाचे?**

दिल्लीच्या 'आप'च्या सरकारच्या उत्पादन शुल्क धोरणाबद्दल नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी जुलै २०२२ मध्ये शंका व्यक्त केली. हे निर्णय 'मनमानी' पद्धतीचे असून त्यामुळे राज्याचे सुमारे ५८० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची तक्रार त्यांनी केली व सीबीआयतर्फे चौकशीची शिफारस केली. सीबीआयने तत्परतेने केजरीवाल, सिसोदिया व इतरांवर छापे घातले. त्यात काही आढळल्याचे त्यांना सांगता आले नाही. या धोरणामुळे 'मद्य लॉबी'चा फायदा झाला, त्यातून मिळालेल्या पैशाचा वापर केजरीवाल यांनी निवडणूक प्रचारात केला, असे आरोप सीबीआयने केले होते. पूर्वीच्या तेलंगण राष्ट्र समितीच्या व आताच्या भारत राष्ट्र समितीच्या माजी नेत्या, तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या के. कविता यांनाही या प्रकरणी आरोपी करण्यात आले. मधल्या काळात केजरीवाल यांना ५ महिने, सिसोदिया यांना १७ महिने व कविता यांना ५ महिने तुरुंगवासही भोगावा लागला. याच काळात केजरीवाल यांनी, मुख्यमंत्री निवासाचे रूपांतर 'शीश महालात' केल्याचा आरोप भाजपने केला. 'भ्रष्टाचाराविरुद्ध लढणारे केजरीवाल भ्रष्ट ठरले' असेही आरोप होऊ लागले. नंतर झालेली दिल्लीची निवडणूक भाजपने जिंकली. केंद्रात बहुमत असताना दिल्लीत सत्ता नसल्याचे शल्य भाजपला होते. ती मिळवण्यातील केजरीवाल हा अडसर दूर करण्यासाठी नायब राज्यपाल त्यांच्या मदतीला आले. आताचे व पूर्वीचेही नायब राज्यपाल केजरीवाल सरकारची विधेयके रोखत होते. केजरीवाल यांना दूर करण्यासाठी मद्य धोरणाचा वापर करण्यात आला, असे मानता येते. सीबीआयच्या दाव्यात 'सकृद्दर्शनी'देखील संशयाचा मागमूसही नाही, पुढे चालवावे असे हे प्रकरण(खटला) नाही; अशा आशयाचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने सीबीआयच्या आरोपपत्रास केराची टोपली दाखवली आहे. सीबीआयने शूरतेचा आव आणून या निकालाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. राजकीय वरिष्ठांना खूष करण्यासाठी त्यांना तसे करणे भाग आहे. पूर्वी आखलेल्या धोरणाला किंवा त्याच्या परिणामांना गुन्हेगारी स्वरूपाचे कारस्थान ठरवता येत नाही, त्यासाठी गुन्हेगारी कायद्याचा वापर करता येणार नाही, असे न्यायालयाने बजावले आहे. 'तपास यंत्रणा राजकीय हत्यार नाहीत' असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. हा मुद्दा मोदी सरकारच्या काळात वारंवार मांडला गेला हे उल्लेखनीय आहे. हे प्रकरण हाताळणाऱ्या सीबीआयच्या अधिकाऱ्यांची अंतर्गत चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याने विभागाची नाचक्की झाली आहे. भाजपने या निकालावर अपेक्षेप्रमाणे टीका केली आहे; मात्र जो 'गुन्हा' घडलाच नव्हता, त्यावर गदारोळ माजवला गेला, तो राजकीय लाभासाठी; हे उघड आहे.

# संघर्षातून नेतृत्वाकडे नौरोती देवीची प्रेरणादायी कहाणी

संघर्षातून नेतृत्वाकडे नौरोती देवीची प्रेरणादायी कहाणी
दी लेडी बॉस : अर्चना सोंडे

जीवनातील कठीण परिस्थितीतूनच खरे नायक घडतात, असे म्हटले जाते. राजस्थानच्या ग्रामीण भागातील नौरोती देवी हिच्या आयुष्यात हे वाक्य अक्षरशः खरे ठरते. ऐतिहासिकदृष्ट्या महिलांना मर्यादित वाव असलेल्या समाजात जन्म घेऊनही, तिने अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धाडस दाखवले. स्वतः सह अनेक उपेक्षितांच्या आयुष्यात बदल घडवून आणला. एकेकाळी दगड फोडून ४ रुपये मजूरी कमावणारी नौरोती देवी संघर्ष करणाऱ्या महिलांसाठी प्रेरणादायी व्यक्ती बनली आहे. राजस्थानमधील किशनगड जिल्ह्यातील एका गरीब कुटुंबात नौरोती देवीचा जन्म झाला.

अठराविश्वे दारिद्र्य असलेल्या घरातून ती बऱ्यापैकी गरीबी असलेल्या लग्नानंतर घरात नांदायला आली. पोटापाण्यासाठी नौरोती दगड फोडण्याचं काम करत होती. कष्टाचे काम करूनही तिला आणि इतर महिला कामगारांना पुरुषांच्या तुलनेत कमी वेतन दिले जात होते. पुरुषांना रोज ७ रुपये, तर महिलांना केवळ ४ रुपये वेतन मिळत होते. 'उच्च वेतन दराच्या मानकांनुसार काम होत नाही' या कारणाखाली हा भेदभाव केला जात होता. हा सरळ सरळ अन्याय होता. या अन्यायाने नौरोती देवी शांत बसली नाही. तिने या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. महिला कामगारांना एकत्र केले आणि न्यायासाठी संघर्ष सुरू केला.



या लढ्याची दखल एका स्वयंसेवी संस्थेने घेतली. त्यांच्या मदतीने नौरोती देवीने हा प्रश्न न्यायालयात नेला. अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत ती लढली. अखेर तिच्या संघर्षाचा विजय झाला. नौरोती आणि तिच्या महिला कामगारांना न्याय मिळाला. हा विजय नौरोती देवीसाठी एक नैतिक आणि ऐतिहासिक विजय ठरला. या संघर्षाने तिला उपेक्षितांच्या सक्षमीकरणासाठी अधिक बळ दिले. दगडफोड कामगार असलेल्या नौरोती देवीला गावकऱ्यांनी गावाचे नेतृत्व करण्याची विनंती केली. पुढे ती हरमाडा ग्रामपंचायतीची सरपंच बनली. सर्व प्रतिकूल परिस्थितींवर मात करत अढळ धैर्य आणि प्रामाणिकपणाने तिने नेतृत्वाची भूमिका स्वीकारली. सरपंच झाल्यानंतर सर्वप्रथम तिने स्वतःचे शिक्षण पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. बंकर रॉय यांनी स्थापन केलेल्या तिलोनिया येथील बेअरफूट महाविद्यालयामध्ये तिने सहा महिन्यांचा साक्षरता कार्यक्रम पूर्ण केला. हरमाडापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या या महाविद्यालयात ती नियमितपणे जायची. अभ्यासूवृत्ती असल्यामुळे तिने अभ्यासक्रम लवकर पूर्ण केला. अभ्यासक्रम पूर्ण होताच त्याच महाविद्यालयात तिने काम करण्यास सुरुवात केली. याच काळात तिने संगणक वापरण्याचे कौशल्य आत्मसात केले.

सरपंच म्हणून तिने ग्रामीण राजस्थानमधील सामाजिक कुप्रथांविरुद्ध लढा उभारला. पंचायत सचिवांना संगणक वापरण्याचे प्रशिक्षण दिले आणि प्रशासनात पारदर्शकता आणली. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी जलकुंभ, हातपंप, शौचालये आणि घरे उभारण्याचे अनेक उपक्रम तिने आपल्या कार्यकाळात राबवले.

दारू माफियांविरुद्ध आवाज उठवून नौरोती देवीने केवळ आपल्या गावातच नव्हे तर शेजारच्या गावांमध्ये देखील स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधा सुधारल्या. आपल्या कार्यकाळाच्या अखेरीस, ग्रामपंचायतीच्या तिजोरीत १३ लाख रुपयांची शिल्लक ठेवून तिने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली.

शिक्षणानंतर तिने महिला सक्षमीकरणासाठी साथीन म्हणून काम करण्यास सुरुवात केली. गावोगावी जाऊन महिलांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करणे, स्वतःची संघर्षकथा सांगून प्रेरणा देणे हे तिचे मुख्य कार्य ठरले. ज्यांना कधीच शाळेचे तोंड पाहता आले नाही अशा महिलांना रोजगार कौशल्ये, गणित आणि हिंदी भाषा शिकवण्याचे महत्वाचे कार्य देखील तिने केले. नौरोती देवी मजदूर किसान शक्ती संघटना या तळागाळातील सामाजिक चळवळीच्या सक्रिय सदस्य आहे. किमान वेतनाच्या मागणीसाठी आणि माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तिने १९८१ पासून चाललेल्या राजस्थानमधील आंदोलनात सहभाग घेतला. या लढ्याचे फलित म्हणजे २००५ मध्ये देशभर लागू झालेला माहिती अधिकार कायदा होय.

नौरोतीची प्रेरणादायी कहाणी भारताबाहेरही पोहोचली. महिला सक्षमीकरण आणि संघर्षाचा अनुभव सांगण्यासाठी तिने चीन, जर्मनी आणि अमेरिकेचा दौरा केला. आजही ती नियमितपणे हिंदी वर्तमानपत्रे वाचते, संगणकावर काम करते आणि समाजातील घडामोडींवर सुद्धा लक्ष ठेवते.

पुढच्या आठवड्यात आपला देश प्रजासत्ताक दिन साजरा करेल. नौरोती देवीसारख्या महिला सर्वार्थाने प्रजासत्ताक भारताचे फलित आहे. या महिलांनी हा देश लोकशाहीदृष्ट्या समृद्ध केला आहे.

# आवाज हरपण्याचे दिवस संपले

**डॉ. कणव कुमार**

भारतामध्ये डोके व मान कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. या कर्करोगांमध्ये तोंड, घसा (आवाजपेटी), थायरॉईड, सायनस, नाक तसेच लाळग्रंथी यांचा समावेश होतो. यापैकी आवाजपेटीचा कर्करोग हा तोंडाच्या कर्करोगानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. अनेक वर्षे या कर्करोगावर संपूर्ण आवाजपेटी काढून टाकणे (टोटल लॅरिंजेक्टॉमी) हा सर्वोत्तम उपचार मानला जात होता. जरी यामुळे कर्करोग बरा होण्याचे प्रमाण चांगले होते, तरी रुग्णाचा आवाज कायमचा हरपायचा. मात्र आजच्या प्रगत तपासणी आणि उपचारांमुळे बहुतेक रुग्णांमध्ये आवाजपेटी जपण्यावर भर दिला जातो.

धूम्रपान आणि मद्यपान ही आवाजपेटीच्या कर्करोगाची दोन प्रमुख कारणे आहेत. हा कर्करोग प्रामुख्याने ५० ते ७० वयोगटातील पुरुषांमध्ये अधिक आढळतो. सततचा घसा बसणे किंवा आवाजात बदल होणे हे याचे सुरुवातीचे आणि महत्त्वाचे लक्षण आहे.



कर्करोग लवकर ओळखला गेला तर ट्रान्सओरल लेझर मायक्रोसर्जरी (टीएलएम) या आधुनिक पद्धतीने उपचार करता येतात. लेझरच्या साहाय्याने आवाजपेटीतील लहान गाठी काढल्या जातात. या उपचारामुळे सुमारे ९० टक्के रुग्ण पूर्णपणे बरे होतात, आवाज व गिळण्याची क्षमता टिकून राहते, खर्च तुलनेने कमी असतो आणि बहुतेक वेळा हा उपचार डे-केअर पद्धतीने केला जातो.

मध्यम टप्प्यातील कर्करोगात रेडिएशन थेरपीसोबत केमोथेरपी दिली जाते. या उपचारपद्धतीमुळे अवयव जपण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून ८० टक्क्यांहून अधिक रुग्णांचा नैसर्गिक आवाज कायम राहतो. प्रगत अवस्थेतील रुग्णांना अजूनही संपूर्ण आवाजपेटी काढण्याची शस्त्रक्रिया करावी लागू शकते. मात्र आजच्या घडीला आवाज पुनर्वसनासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. व्हॉइस प्रोस्थेसिस, इलेक्ट्रॉनिक लॅरिंक्स किंवा अन्ननलिकेच्या सहाय्याने बोलण्याचे प्रशिक्षण. यामुळे अशा रुग्णांनाही पुन्हा संवाद साधता येतो.

आधुनिक उपचार आणि समर्पित पुनर्वसनामुळे कर्करोगामुळे आवाज गमावणे आता अटळ राहिलेले नाही. आज बहुतेक रुग्ण आपला नैसर्गिक आवाज जपू शकतात आणि ज्यांना मोठी शस्त्रक्रिया करावी लागते, तेही योग्य प्रशिक्षणामुळे पुन्हा बोलू शकतात. वेळेवर तपासणी आणि योग्य उपचारांमुळे प्रत्येक रुग्णाला केवळ आपला आवाजच नव्हे, तर आत्मविश्वास आणि जीवनाचा दर्जाही पुन्हा मिळवण्याची संधी मिळू शकते. - सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट, हेड अॅण्ड नेक कॅन्सर इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




ही अवस्था येण्याअगोदर प्रत्येक पुरुषाला काही संवेदना होतात. त्या संवेदना ओळखून जर त्याच वेळेस उत्तेजना आणणं बंद केलं, तर वीर्यस्खलन बंद होत नाही. परत काही वेळानंतर समागम सुरू करता येतो. ही प्रक्रिया तीन-चार वेळा केल्यानंतर वीर्यस्खलन होऊ द्यावं. अशाप्रकारे प्रयत्न केल्यास काही आठवड्यात त्यांचे शीघ्रपतन कमी होऊन दोघांनाही कामतृप्तीचा अनुभव घेता येऊ शकतो.शीघ्रपतनावर बरीचशी औषधेपण देता येतात. या औषधाचा प्रभाव फक्त औषध घेत असेपर्यंत असतो.

## २ Joke विनोद




दोन माणसे समोरासमोर उभी राहिली. आता तुम्ही अशी गोष्ट करा की ते दोघे एकमेकांना स्पर्श करू शकणार नाहीत.
त्यांच्या दोघांमधील दार लावून घेऊ की झाले !

## ३ Message संदेश




Bhagwan Ki Tabyat Kharab Hai
Bacha Khel Ker Ghar Aya To Maa
Se Pucha:"Maa, Kiya Bhagwan Ki
Tabyat Kharab Hai?"
Maa: Tumhen Kis Ny Kaha??
Bacha: Bahar Log Keh Rahy Thy K
Shehr K Bary Doctor Ko
Bhagwan Ny Apny Pass Bula Liya
Ha.

## ४ Thought सुविचार




माणसाने मोठेपण त्याने किती माणसे मोठी केली यावरुन सिद्ध होते.

- गोपाळकृष्ण गोखले

**संस्कृत सुभाषित**

अनिर्वेद: श्रियो मूलं लाभस्य
च शुभस्य च।।
(उद्योगपर्व, अध्याय ३९, श्लोक ५९, महाभारत)
अर्थ- लक्ष्मीचे, लाभाचे आणि कल्याणाचे मूळ सतत उद्योग करणे हे आहे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. '--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान है'
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

## उभे शब्द

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी, ५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

## आडवे उत्तर


१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

## उभे उत्तर

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर




## थोडक्यात/ संक्षिप्त



### कोणत्या संघाने वेगवेगळ्या देशांविरुद्ध खेळले सर्वाधिक टी-२० सामने?

**मुंबई :** टी-२० हा प्रकार बऱ्याच काळापासून क्रिकेट जगतावर राज्य करत आहे. आतापर्यंत १०८ देशांनी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं आहे, परंतु एक नाव वेगळं आहे, ते म्हणजे युएई. वाळवंटातील या संघानं केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रवेश केला नाही तर सर्वाधिक वेगवेगळ्या देशांविरुद्ध खेळण्याचा अनोखा विक्रमही केला आहे. त्यापैकी, युएई क्रिकेट संघानं वेगवेगळ्या देशांविरुद्ध सर्वाधिक टी-२० सामने खेळले आहेत. ३६ वेगवेगळ्या देशांविरुद्ध खेळलं क्रिकेट : युएई क्रिकेट संघानं आतापर्यंत एकूण १४७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. :

**युएई** – ३६ देश (१४७ सामने)
**झिम्बाब्वे** – ३२ देश (१८९ सामने)
**ओमान** – ३१ देश (११३ सामने)
**नेपाळ** – ३१ देश (११६ सामने)
**केनिया** – ३१ देश (१२१ सामने)
**हाँगकाँग** – ३१ देश (१२१ सामने)
**आयर्लंड** – ३० देश (१८८ सामने)
**नामिबिया** – २८ देश (८८ सामने)
**कॅनडा** – २८ देश (९० सामने)

### विराट-रोहित दिसणार भारतीय जर्सीत; बीसीसीआय ची मोठी घोषणा

मुंबई २ मार्च (पीएसआय)
भारत आणि अफगाणिस्तान क्रिकेट संघात द्विपक्षीय मालिका खेळवली जाणार आहे. त्यात कसोटी आणि वनडे सामने असतील. ही मालिका होणार अशी शक्यता यापूर्वीच वर्तवण्यात आली होती. अशातच आता बीसीसीआयनं मालिकेचं संपूर्ण वेळापत्रक आणि ठिकाणं जाहीर केली आहेत. विशेष म्हणजे या मालिकेदरम्यान विराट कोहली आणि रोहित शर्मा पुन्हा मैदानावर खेळताना दिसतील. तर शुभमन गिल देखील बऱ्याच काळानंतर खेळणार आहे. ६ जूनपासून होणार मालिकेला सुरुवात : अफगाणिस्तान क्रिकेट संघ या वर्षी जूनमध्ये भारत दौऱ्यावर येईल. यामध्ये एक कसोटी सामना आणि तीन वनडे सामने असतील. बीसीसीआयनं जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, ६ ते १० जून दरम्यान न्यू चंदीगडमध्ये एकमेव कसोटी सामना खेळला जाईल. या मालिकेत फक्त एक कसोटी सामना असेल आणि त्यानंतर तीन वनडे सामने होतील.१४ जूनपासून वनडे मालिका : भारत विरुद्ध अफगाणिस्तान वनडे मालिकेचा पहिला सामना १४ जून रोजी धर्मशाळा इथं खेळला जाईल.

### टी-२० विश्वचषकात टीम इंडियाचा मोठा धमाका; पाकिस्तान आणि इंग्लंडच्या विक्रमाची बरोबरी

**कोलकाता** –२०२६ च्या आयसीसी टी-२० विश्वचषकात टीम इंडियानं एक मोठा टप्पा गाठला आहे. कोलकात्यातील ऐतिहासिक ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजवर रोमांचक विजय मिळवून, भारतानं केवळ उपांत्य फेरीत प्रवेश केला नाही तर पाकिस्तान आणि इंग्लंडच्या प्रतिष्ठित विक्रमाची बरोबरीही केली आहे. टीम इंडिया सहाव्यांदा उपांत्य फेरीत : टीम इंडिया आता पुरुष टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सहा वेळा उपांत्य फेरीत पोहोचणारा संघ बनला आहे. यापूर्वी, भारतीय संघानं २००७, २०१४, २०१६, २०२२ आणि २०२४ मध्ये अंतिम चारमध्ये पोहोचण्याचा पराक्रम केला होता. २०२६ मध्ये उपांत्य फेरी गाठून, भारतानं या प्रतिष्ठित यादीत पाकिस्तान आणि इंग्लंडची बरोबरी केली आहे. इंग्लंड आणि पाकिस्तानही प्रत्येकी सहा वेळा टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहोचले आहेत.

# अंतिम फेरीचे लक्ष्य; पहिल्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिका-न्यूझीलंड आज एकमेकांसमोर

टी२० विश्वचषकाच्या पहिल्या उपांत्य सामन्यात आज दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात चुरशीची लढत होणार आहे. 'चोकर'चा शिक्का पुसण्यासाठी दक्षिण आफ्रिका सज्ज असून न्यूझीलंडच्या फिरकीचे त्यांच्यासमोर मोठे आव्हान असेल.
दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड संघांदरम्यान बुधवारी होणारा ट्वेन्टी-२० विश्वचषकाचा पहिला उपांत्य सामना चुरशीचा होणे अपेक्षित आहे. या सामन्यात दोन्ही संघांच्या कर्णधारांची भूमिका महत्त्वपूर्ण असेल. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडीन मार्करम आणि न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर हे दोघेही चांगल्या लयीत आहेत. त्यामुळे दोघांमध्ये चांगली स्पर्धा पाहायला मिळेल.
२०१५ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला नमविले होते. त्यामुळे डेल स्टेन आणि ए बी डिव्हिलियर्स यांसारख्या खेळाडूंना धक्का बसला होता. दक्षिण आफ्रिकेचा संघ हा जागतिक क्रिकेटमध्ये भक्कम समजला जातो. गेल्या वर्षी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा जिंकताना त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले होते. दक्षिण आफ्रिकेला आतापर्यंत मर्यादित षटकांच्या प्रारूपात कोणताही 'आयसीसी' चषक उंचावता आला नाही. त्यामुळे यावेळी त्यांचा पूर्ण प्रयत्न राहणार आहे.
मार्करम, सँटनर केंद्रस्थानी मार्करमने स्पर्धेत आतापर्यंत १७५ हून अधिकच्या 'स्ट्राइक रेट'ने २६८ धावा केल्या आहेत. त्याने 'पॉवरप्ले'मध्ये आपली चुणूक दाखवली. दुसरीकडे, सँटनरने फलंदाजांना अडचणीत आणले. यासह फलंदाजीतही त्याने योगदान दिले. मार्करम, क्विंटन डिकॉक, डेवॉल्ड ब्रेव्हिस, रायन रिकेल्टन, ट्रिस्टन स्टब्स, डेव्हिड मिलर आणि मार्को यान्सन यांसारखे फलंदाज दक्षिण आफ्रिकेकडे आहेत. मात्र, सँटनरकडे रचिन रवींद्र (नऊ बळी), ग्लेन फिलिप्स आणि कोल मॅकाँची यांसारख्या फिरकीपटूंचा पर्याय आहे. या सर्वांनी मिळून चांगली कामगिरी केली. भारत सोडल्यास दक्षिण आफ्रिकेचा संघ प्रथमच चांगल्या फिरकी माऱ्याचा सामना करेल. न्यूझीलंडच्या ईश सोढीची लय ही संघाच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. त्याने आतापर्यंत खेळलेल्या सामन्यांत प्रभावी कामगिरी केलेली नाही.

**संघ :न्यूझीलंड**
**मिचेल सँटनर (कर्णधार), फिन एलन, टिम सेफर्ट, रचिन रवींद्र, डेव्हॉन कॉन्वे, काएल जेमिसन, जेकब डफफी, ग्लेन फिलिप्स, डॅरेल मिचेल, मार्क चॅपमन, मॅट हेन्री, ईश सोढी, लॉकी फर्ग्यूसन, कोल मॅकाँची, जेम्स नीशम.**






**वेळ सायं. ७ वा.**

**थेट प्रक्षेपण**
**स्टार स्पोर्ट्स १,२, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.**

**संघ दक्षिण आफ्रिका**
**एडीन मार्करम (कर्णधार), क्विंटन डिकॉक, रायन रिकेलटन, डेव्हॉल्ड ब्रेव्हिस, डेव्हिड मिलर, ट्रिस्टन स्टब्स, मार्को यान्सन, कॉर्बिन बॉश, कगिसो रबाडा, केशव महाराज, लुंगी एन्गिडी, जॉर्ज लिंडे, क्वेना मफाका, आनरिक नॉर्किए, जेसन स्मिथ.**


ईडन गार्डन्स खेळपट्टी फलंदाजांना अनुकूल?
ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीवर दक्षिण आफ्रिकेचा संघ न्यूझीलंडविरुद्ध लक्ष्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करेल. न्यूझीलंडने आपले सर्व 'अव्वल आठ' फेरीतील सामने श्रीलंकेच्या धिम्या खेळपट्ट्यांवर खेळले आहेत. कोलकाताची खेळपट्टी फलंदाजांना अनुकूल असते. त्यामुळे फिन ॲलन, टिम सेफर्ट, ग्लेन फिलिप्स आणि डॅरेल मिचेल यांना प्रथम फलंदाजी करण्याची संधी मिळाल्यास त्यांचा प्रयत्न २००हून अधिक धावा करण्याचा असेल. लुंगी एन्गिडीच्या गोलंदाजीवर दक्षिण आफ्रिकेची मदार असेल.तर, न्यूझीलंडचा लॉकी फर्ग्यूसनही गोलंदाजीत महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो. त्यामुळे पहिल्या उपांत्य सामन्यात दोन्ही संघांमध्ये चांगली चुरस पहायला मिळेल.

## इराण - इस्त्राईल युद्धाचा टी२० वर्ल्ड कपवर परिणाम, झिम्बाब्वे संघ भारतात आणखी किती दिवस थांबणार?

दिल्ली–टी२० वर्ल्ड कप २०२६ ही स्पर्धा आता शेवटच्या टप्प्यात येऊन पोहोचली आहे. स्पर्धेतील सुपर ८ फेरी संपली असून यातून भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि न्यूझीलंड हे संघ सेमी फायनलमध्ये पोहोचलेत. तर उर्वरित संघ आपल्या मायदेशात परतत आहेत. अशातच इराण – इस्त्राईल युद्धामुळे झिम्बाब्वेचा संघ भारतात अडकला आहे. झिम्बाब्वेचा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शेवटचा सुपर ८ सामना रविवारी दिल्ली येथे झाला होता. त्यानंतर झिम्बाब्वेचा संघ दुसऱ्याच दिवशी मायदेशात परतणार होता, मात्र मिडिल ईस्टमध्ये इराण, इस्त्राईल, तेहरान येथे युद्ध सुरु असल्याने तेथिल वातावरण बिघडलं आहे. परिणामी झिम्बाब्वे संघाचा पुढील काही दिवसांसाठी दिल्लीतील मुक्काम वाढला आहे.
झिम्बाब्वेने सुपर ८ चे तिनही सामने गमावले :
रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झिम्बाब्वे यांच्यात सुपर ८ चा सामना रंगला होता, ज्यात झिम्बाब्वेचा ५ विकेटने पराभव झाला. या पराभवानंतर झिम्बाब्वेचा संघ मायदेशात परतण्यासाठी तयार होता. सोमवारी सकाळी ४:३० वाजता त्यांची एमिरेट्सच्या विमानाची तिकीट बुक होती जी दुबईमार्गे हरारेला जाणार होती. मात्र रिपोर्ट्सनुसार टीम मॅनेजमेंटने निर्णय बदलला आहे. मात्र दोन दिवसात यूएसए, इराण आणि इस्त्राईल यांच्यात युद्ध सुरु आहे. इराणने यूएई, कतार, सह बहरीन इत्यादी खाडी देशात हल्ले केलेत. त्यामुळे मिडल ईस्टच्या देशांनी सर्व हवाई मार्ग बंद केलेत.
आयसीसी करणार व्यवस्था :
झिम्बाब्वे क्रिकेट संघाला दिल्लीतच थांबण्याचे निर्देश दिले आहेत जोपर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेट काउन्सिलची टीम त्यांच्या प्रवासाची सुरक्षित व्यवस्था करत नाहीत.
झिम्बाब्वेच्या संघात अनुभवी लेग स्पिनर ग्रीम क्रेमर हा दुबईत राहणार आहे. त्यांचे सहकारी देखील मध्य पूर्व प्रवास केंद्रातून प्रवास करण्याची तयारी करत असताना, झिम्बाब्वेचे प्रशिक्षक जस्टिन सिमन्स यांनी मध्य पूर्वेवरील हवाई क्षेत्र बंद असल्याने आणि प्रवासाच्या कठीण परिस्थितीमुळे कॅम्पमध्ये सध्या काय स्थिती आहे याबद्दल सांगितले.झिम्बाब्वे संघाने केले दोन उलटफेर : झिम्बाब्वे संघाचा सुपर ८ मधील परफॉर्मन्स समाधानकारक नसला तरी त्यांनी ग्रुप स्टेजमध्ये ऑस्ट्रेलिया, श्रीलंका सारख्या संघांना मात दिली आहे. ग्रुप स्टेजमध्ये ऑस्ट्रेलिया, श्रीलंकेला पराभूत करून हा संघ पॉईंट्स टेबलमध्ये टॉपवर पोहोचला होता. मात्र सुपर ८ फेरीत भारत, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिजकडून त्यांना पराभव स्वीकारावा लागला.

## आयसीसी संजू सॅमसनवर कारवाई करण्याची शक्यता, कारण काय?

दिल्ली–आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या स्पर्धेतील सुपर-८ मध्ये काल भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात सामना खेळवण्यात आला. या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजवर ५ विकेट्सने विजय मिळवला. या विजयासह भारताने उपांत्य फेरीत स्थानही निश्चित केले. दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि न्यूझीलंडनंतर भारत उपांत्य फेरीत पोहोचणारा चौथा संघ ठरला. वेस्ट इंडिजने पहिल्या डावात १९५ धावा केल्या आणि प्रत्युत्तरात भारताने हे लक्ष्य चार चेंडू शिल्लक असताना गाठले. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात भारताने उपांत्य फेरीत प्रवेश करण्याची ही सहावी वेळ आहे. सूर्यकुमार यादव, अभिषेक शर्मा आणि इशान किशन अपयशी ठरले तेव्हा संजू सॅमसनने जबाबदारी स्वीकारली आणि ९७ धावांची ऐतिहासिक खेळी केली. सॅमसनने या ऐतिहासिक खेळीत १२ चौकार आणि चार षटकार मारले.



दरम्यान, चौकार ठोकत सामना विजयी झाल्यानंतर संजू सॅमसनने हेल्मेट मैदानावर फेकून एक अनोखे सेलिब्रेशन केले. संजूच्या या सेलिब्रेशनावर आता सोशल मीडियावर प्रश्न उपस्थित होत आहेत. हेल्मेट फेकल्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद त्याला या कृत्यासाठी संजू सॅमसनला दंड करू शकते का?, असा सवाल विचारला जातोय. मात्र आयसीसीचे याबाबत नेमके नियम काय?, याबाबत जाणून घ्या...
संजूने आपले हेल्मेट मैदानावर फेकणे महागात पडू शकते. घ्ण त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करू शकते. नियमांनुसार, खेळाडूंनी हेल्मेट किंवा बॅट मैदानावर फेकणे हे अयोग्य वर्तन मानले जाते. खेळाडूंनी केलेल्या अशा वर्तनाबद्दल खेळाडूंना दंड, डिमेरिट पॉइंट्स किंवा निलंबनाला सामोरे जावे लागू शकते. आयसीसी खेळाडू, पंच आणि मैदानावरील इतरांच्या सुरक्षिततेची खात्री करते. म्हणून, खेळाडूंना बॅट आणि हेल्मेटसारख्या वस्तू मैदानावर फेकण्यास मनाई आहे. यामुळे अनवधानाने दुखापत होऊ शकते.भारत आणि वेस्ट इंडिजचा सामना संपल्यानंतर गौतम गंभीरने माध्यमांशी संवाद साधला. यावेळी गौतम गंभीरने संजू सॅमसनचे तोंडभरुन कौतुक केले. संजू सॅमसन हा एक जागतिक दर्जाचा खेळाडू आहे. संजू सॅमसनने टी-२० क्रिकेटमध्ये ३ शतके झळकावली आहेत. आम्हाला त्याची प्रतिभा नेहमीच माहिती होती. न्यूझीलंडविरुद्धची मालिका कठीण होती, कधीकधी त्याला विश्रांती देणे महत्त्वाचे असते. पण आम्हाला नेहमीच माहिती होते की, जेव्हा जेव्हा आम्हाला विश्वचषक सामन्यात संजू सॅमसनची गरज असेल तेव्हा तो येईल आणि कामगिरी करेल, असे गौतम गंभीर म्हणाला.

## अरे मी बॅटिंग कशी करणार...., रिंकू सिंह संजूची बॅट परत करायलाच विसरला

**मुंबई–**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात रविवारी कोलकाताच्या ईडन गार्डन स्टेडियमवर सुपर ८ चा शेवटचा सामना खेळवला गेला होता. या सामन्यात टीम इंडियाने वेस्ट इंडिजवर ५ विकेट्सने विजय मिळवला आणि सेमी फायनलसाठी ते क्वालिफाय झाले. या सामन्यात टीम इंडियाला विजयासाठी १९६ धावांचं आव्हान मिळालेलं असताना फलंदाज संजू सॅमसनने जबरदस्त खेळी केली. टीम इंडियाचे इतर फलंदाज एकामागोमाग एक बाद होत असताना त्याने ९७ धावा करून भारताला एकहाती विजय मिळवून दिला. मात्र चालू सामन्यादरम्यान मैदानात असं काही घडलं की पाहून सर्वच हसायला लागले. सध्या मैदानावर घडलेल्या या धमाल किस्स्याच्या व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय.
रिंकू सिंह संजूची बॅट परत करायलाच विसरला : वेस्ट इंडिजमध्ये भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरलेला संजू सॅमसनने ५० बॉल खेळताना १२ चौकार आणि ४ षटकार ठोकले. भारतीय संघातून इतर कोणताही फलंदाज ३० धावांच्या वर स्कोअर करू शकला नाही. मात्र भारताने संजूच्या तुफान खेळीमुळे सेमी फायनलमध्ये जागा मिळवली.
सामना सुरु असताना रिंकू सिंह हा पाणी आणि टॉवेल घेऊन कुलदीप यादव सोबत मैदानात आला होता. संजूला पाणी दिलं त्याला घाम पुसण्यासाठी टॉवेल ऑफर केला. तोपर्यंत रिंकू सिंहने त्याच्या काखेत संजूची बॅट पकडली होती.
संजूचं पाणी पिऊन झाल्यावर रिंकू सिंह आणि कुलदीप यादव पुन्हा पॅव्हेलियनमध्ये परतत होते, तेवढ्यात संजूच्या लक्षात आलं की रिंकूने त्याची बॅट परत केली नाही.
त्याने रिंकूला थांबवलं आणि त्याच्याकडून बॅट घेतली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय.
संजू सॅमसनने मोडला विराटचा रेकॉर्ड : भारत विरुद्ध वेस्ट इंडिज सामन्यात संजू सॅमसनने टी२० वर्ल्ड कपमध्ये धावांचा पाठलाग करताना भारताकडून सर्वाधिक धावा करण्याचा विराट कोहलीचा रेकॉर्ड मोडला.



# पी.व्ही.सिंधू सुखरुप मायदेशी परतली; ऑल इंग्लंड स्पर्धेला मुकणार

**दुबई:**भारताची अव्वल बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू युद्धजन्य परिस्थितीतून मायदेशी सुखरुप परतली आहे. इंग्लंडमध्ये आयोजित ऑल इंग्लंड बॅडमिंटन या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ती निघाली होती मात्र दुबईत असताना परिस्थिती चिघळल्याने ती तिथेच अडकली. शनिवार संध्याकाळपासून सिंधू दुबईतच अडकली होती.
सिंधूने मायदेशी परतल्यानंतर लिहिलं, 'बंगळुरूला सुखरुप पोहोचले. गेले काही दिवस अत्यंत अस्थिर आणि भयंकर असे होते. दुबई विमानतळावरील ग्राऊंडस्टाफ, दुबई शहरातील प्रशासन यंत्रणा, विमानतळ कर्मचारी, इमिग्रेशन विभागाचे कर्मचारी आणि आम्हाला मदत करणाऱ्या प्रत्येकाची मी ऋणी आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत तुम्ही आमची सर्वतोपरी काळजी घेतलीत. तुम्ही दाखवलेली तत्परता, काळजी आणि व्यासायिकता कधीच विसरता येणार नाही. तुम्ही जे केलं ते शब्दातीत आहे. आता काही दिवस विश्रांती घेईन आणि पुढचं वेळापत्रक आखेन'.
ऑल इंग्लंड ही बॅडमिंटन विश्वातली अत्यंत मानाची स्पर्धा समजली जाते. १८९९ पासून आयोजित होणाऱ्या या स्पर्धेचं जेतेपद पटकावणं खडतर मानलं जातं. १९८० साली प्रकाश पदुकोण यांनी या स्पर्धेचं जेतेपद पटकावत इतिहास घडवला. २०११ मध्ये पुलेला गोपीचंद यांनी पदुकोण यांचा कित्ता गिरवत जेतेपदावर नाव कोरलं. सायना नेहवाल आणि पी.व्ही.सिंधू या दोघी अनेक वर्ष या स्पर्धेत सहभागी झाल्या मात्र जेतेपदाने त्यांना हुलकावणी दिली आहे. दोन ऑलिम्पिक पदकं नावावर असलेल्या सिंधूला या स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरायचं आहे. मात्र यंदाच्या स्पर्धेत युद्धामुळे तिला स्पर्धेत खेळता येण्याविषयीच साशंकता निर्माण झाली आहे.ऑल इंग्लंड स्पर्धा ३ ते ८ मार्च या कालावधीत होणार आहे. मात्र सिंधू तिच्या टीमसह दुबईतच अडकली होती.



पी.व्ही. सिंधू युद्धजन्य परिस्थितीत थोडक्यात बजावली

**दुबई विमानतळावर हल्ला**
**अमेरिका आणि इस्त्रायल यांच्या इराणवरील संयुक्त कारवाईनंतर संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. अमेरिका व इस्त्रायलच्या कारवाईनंतर इराणने आखाती देशांतील अमेरिकेचे मित्रदेश तसेच तेथील अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य केल्याची माहिती आहे. 'रॉयटर्स'ने दिलेल्या वृत्तानुसार, रात्री झालेल्या इराणी हल्ल्यांत दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच शेजारील ऐतिहासिक बुर्ज अल अरब हॉटेलचे नुकसान झाले आहे. तसेच बुर्ज खलिफा परिसरालाही लक्ष्य करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. रविवारी पहाटे अमिरातीच्या मीडिया ऑफिसने दिलेल्या माहितीनुसार, विमानतळावरील घटनेत चार जण जखमी झाले आहेत.**

विमानतळ यंत्रणांनी त्यांची सुरक्षित ठिकाणी व्यवस्था केल्याचं तिने म्हटलं आहे.
सिंधूची पहिली लढत थायलंडच्या सुपानिंदा काथेआंगशी होणार होती. दरम्यान आम्ही परिस्थितीचं रिअल टाईम अवलोकन करत आहोत असं जागतिक बॅडमिंटन संघटनेनं म्हटलं आहे. या स्पर्धेत सहभागी होणार असलेले अन्य खेळाडू सिंगापूर आणि आफ्रिकेमार्गे बर्मिंगहॅम इथे पोहोचले आहेत. परिस्थिती गंभीर आहे. आपात्कालीन परिस्थितीत खेळाडूंना सुरक्षितपणे बर्मिंगहॅम इथे पोहोचता यावं यासाठी आम्ही संबंधित यंत्रणांच्या संपर्कात आहोत.भारताचे लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी हे बर्मिंगहॅम इथे दाखल झाले आहेत. मालविका बनसोड महिला एकेरीत खेळताना दिसणार आहे. उन्नती हुडाचं विमान रद्द झालं. तिला आफ्रिकेमार्गे बर्मिंगहॅम गाठावं लागलं. जेटलॅगला बाजूला सारत तिला पहिला सामना खेळावा लागणार आहे. पुरुष दुहेरीत सात्विकसैराज रणकिरेड्डी आणि चिराग शेट्टी भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. त्रेसा जॉली आणि गायत्री गोपीचंद महिला दुहेरीत खेळणार आहेत. ध्रुव कपिला आणि तनिशा क्रॅस्टो मिश्र प्रकारात सहभागी होतील.सिंधूने मांडली होती तिची व्यथा काही तासांपूर्वी आम्ही विमानतळावर ज्या ठिकाणी लपलो होतो, त्याच्या जवळच एक स्फोट झाला. माझे प्रशिक्षक धूर आणि ढिगाऱ्याच्या अगदी जवळ असल्याने त्यांना त्या भागातून तातडीने बाहेर पडावे लागले. तो आमच्या सर्वांसाठी अत्यंत तणावपूर्ण आणि भयावह क्षण होता.
ती पुढे म्हणाली, दुबई विमानतळावरील कर्मचाऱ्यांच्या आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आम्ही सर्वजण आता सुरक्षित आहोत आणि आम्हाला अधिक सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. आम्हाला सुरक्षित ठेवण्यासाठी आणि सतत मदत केल्याबद्दल दुबईतील भारतीय उच्चायुक्तालयाचे विशेष आभार. सध्या परिस्थिती सुधारण्याची वाट पाहत असताना आम्ही थोडी विश्रांती घेण्याचा आणि आशावादी राहण्याचा प्रयत्न करत आहोत.

# ई-चलन विरोधात वाहतूकदारांचा एल्गार

## ५ मार्च २०२६ पासून राज्यव्यापी आंदोलन, बेमुदत चक्काजाम

## लातूर जिल्ह्यातील वाहतुकदार संघटनाही होणार आंदोलनात सहभागी

**लातूर/प्रतिनिधी :** परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांची ई चलन पद्धत जाचक आणि अन्यायकारक असल्याचा दावा करीत राज्यातील अनेक वाहतूकदार संघटनांनी एकत्र येत येत्या ५ मार्च २०२६ पासून बेमुदत बंद आणि आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. जाचक ई-चलन प्रणालीमुळे चुकीचे दंड आकारण्यात येत असून वाहतूकदारांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीने केला आहे.

राज्यात परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांच्या वतीने ई-चलन प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून जाचक आणि अन्यायकारक दंड आकारण्यात येत आहे यातून सर्वसामान्य वाहतूकदारांची आर्थिक पिळवणूक रोखण्यासाठी ई-चलन प्रणाली रद्द करून जाचक दंड वसुली थांबवावी या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीने राजव्यापी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. या आंदोलनात राज्यातील सर्व वाहतुकदारांनी सहभागी व्हावे असे आवाहन कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान वाहतूकदार संघटनांनी पुकारलेले हे आंदोलन मागे घेण्याचे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. आपल्या मागण्या संवादातून सोडविल्या जातील या संदर्भात ५ मार्च रोजी परिवहन आयुक्त, पोलीस प्रशासन व वाहतूकदार संघटनांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे सरनाईक यांनी सांगितले आहे.

वाहतूकदारांच्या या राज्यव्यापी आंदोलनात लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशन, लातूर जिल्हा युवा मोटार मालक संघ, लोकनायक मोटार चालक मालक संघ सहभागी होत आहेत. ई-चलन मुळे होत असलेल्या अन्यायाविरोधात लातूर जिल्ह्यातील सर्व वाहतूकदार संघटनांनी, सर्वसामान्य वाहतुकदारांनी या राज्यव्यापी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन सुनिल देशपांडे, डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल, सोमनाथ मेदगे, संदीप पाटील, जगदीश स्वामी, विश्वास कुलकर्णी, उत्तम लोंढे, मदन केंद्रे, जाकीर सय्यद, प्रितेश भंडारी, नरेश घंटे यांनी केले आहे.



# सरस्वती महाविद्यालयाच्यावतीने माजी खासदार डॉ. जनार्धन वाघमारे सर यांना श्रद्धांजली अर्पण



**लातूर/प्रतिनिधी :** सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर याठिकाणी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे संस्थापक कुलगुरू,माजी खासदार डॉ.जनार्धन वाघमारे सर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ.राम बोरगावकर यांनी डॉ. जनार्धन वाघमारे सरांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. त्यांनी त्यांच्या शैक्षणिक व अध्यापन क्षेत्रातील योगदानाबरोबरच ‘ लातूर पॅटर्न’ चे जनक म्हणून केलेले कार्य अधोरेखित केले. तसेच माजी नगराध्यक्ष, माजी कुलगुरू आणि राज्यसभेतील खासदार म्हणून त्यांनी बजावलेली संसदीय जबाबदारी, त्यांचे लेखन व ग्रंथप्रकाशन, तसेच मिळालेले विविध पुरस्कार व सन्मान यांचा उल्लेख करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी दोन मिनिटे मौन पाळून आदरांजली वाहिली. यावेळी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ राम बोरगावकर,प्रा.डॉ. सुदाम पवार,प्रा.तुकाराम येमले,प्रा.श्रीमंत दोरवे,प्रा.डॉ.बालाजी शिंदे,श्री.श्रीकांत शिंदे,श्री.जाधव साहेब तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सेवा संकल्प ठराव द्वारे नागरिक-केंद्रित प्रशासनासाठी वचनबद्धतेची पुष्टी केली



**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २ मार्च २०२६ रोजी ऐतिहासिक सेवा संकल्प ठराव वर चर्चा करण्यासाठी एक बैठक बोलावली. या बैठकीचे अध्यक्षस्थान विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) सोलापूर डॉ. सुजीत मिश्रा यांनी सेवा संकल्प ठराव वाचून दाखवला. त्यानंतर त्याच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आणि विभागातील प्रभावी अंमलबजावणीवर सखोल चर्चा झाली. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली २४.०२.२०२६ रोजी सेवा तीर्थ येथे झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार हाती घेतलेल्या देशव्यापी उपक्रमाचा हा एक भाग आहे. या बैठकींद्वारे, रेल्वे मंत्रालय सर्व स्तरांवर संवेदनशीलता निर्माण करण्याचे आणि त्यांच्या धोरणांमध्ये, कार्यक्रमांमध्ये आणि दैनंदिन कामकाजात ठरावातील तत्त्वे समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट ठेवते. तत्पूर्वी, मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे प्रमुख विभाग प्रमुखांसोबत बैठक घेतली, ज्यामध्ये ठरावाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रमुख तत्त्वे आणि पद्धतींवर चर्चा करण्यात आली.

**सोलापूर विभागातील चर्चेतील प्रमुख मुद्दे:**

- **पायाभूत सुविधा विकासाद्वारे कर्मचारी कल्याण**
- **डिजिटल उपक्रमांद्वारे पारदर्शकता**
- **आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब**
- **नागरिक-केंद्रित सेवा वितरण**
- **ऐतिहासिक मैलाचा दगड**

**सेवा संकल्प ठराव**

हा ठराव संवैधानिक मूल्ये, पारदर्शकता, जबाबदारी आणि सार्वजनिक सेवेच्या भावनेप्रती सरकारच्या अढळ वचनबद्धतेचा पुनरुच्चार करतो. केंद्रीय मंत्रिमंडळाने पुन्हा एकदा सांगितले की सेवा तीर्थ येथे घेतलेले निर्णय ‘‘नागरिक देवो भव‘‘ (नागरिक दैवी आहे) या भावनेने मार्गदर्शन केले जातील, सत्तेपेक्षा सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित केले जाईल आणि १.४ अब्ज नागरिकांच्या कल्याणाला प्राधान्य दिले जाईल. धोरणनिर्मितीमध्ये पारदर्शकता, प्रतिसाद आणि संविधानाचे पालन यावर भर देण्यात आला. केंद्रीय मंत्रिमंडळाने ‘‘विकसित भारत २०४७‘‘ च्या दृष्टिकोनाप्रती आपली वचनबद्धता पुन्हा एकदा निश्चित केली, ज्याचे उद्दिष्ट स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत भारताला विकसित आणि स्वावलंबी राष्ट्रात रूपांतरित करणे आहे. सोलापूर विभागाने या ठरावाचे कौतुक केले आणि धोरणे, कार्यक्रम आणि दैनंदिन कामकाजात त्याची तत्त्वे एकत्रित करण्याची पूर्ण वचनबद्धता व्यक्त केली, ज्यामुळे जबाबदार प्रशासन आणि नागरिक कल्याणात अर्थपूर्ण योगदान मिळेल.

# गौरव सांघिक कार्याचा -आमचे ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या शिरपेचात मानाचा तुरा

**लातूर/प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धनाच्या अखंड आणि निःस्वार्थ कार्याची दखल घेत ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन या सामाजिक संस्थेला राज्यस्तरीय ‘छत्रपती शिवाजी महाराज पर्यावरण पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले. रंगकर्मी साहित्य क्रीडा कला प्रतिष्ठान उदगीर यांच्या वतीने उदगीर येथे आयोजित भव्य समारंभात हा सन्मान सोहळा संपन्न झाला.

मागील २४६७ दिवसांपासून लातूर शहर व परिसरात हरित चळवळ राबविणाऱ्या ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनने पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि स्वच्छता मोहिमा अशा विविध उपक्रमांद्वारे शहराच्या पर्यावरणीय रूपात लक्षणीय बदल घडवून आणला आहे. ‘‘आपलं लातूर हरित, स्वच्छ आणि सुंदर व्हावं’’ या ध्येयाने प्रेरित होऊन संस्थेचे सदस्य निसर्ग सेवेचे व्रत जोपासत कार्यरत आहेत.

या उल्लेखनीय कार्याचा सन्मान म्हणून आयोजित कार्यक्रमात मा. श्री. संजयजी बनसोडे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी लातूरमध्ये उभारलेली हरित चळवळ ही प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. ‘‘लातूरप्रमाणेच उदगीर शहरही हरित आणि पर्यावरणपूरक व्हावे, यासाठी ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनने आपले मार्गदर्शन व सहकार्य द्यावे,’’ अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.




पुरस्कार स्वीकारण्यासाठी संस्थेचे दयाराम सुडे, अरविंद फड, आकाश सावंत आणि किरण जाधव हे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते हा सन्मान स्वीकारताना संस्थेच्या सर्व सदस्यांच्या परिश्रमांचे प्रतीक म्हणून हा पुरस्कार स्वीकारल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

संस्थेचे मार्गदर्शक डॉ. पवन लड्डा यांनी या गौरवाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, ‘‘हा पुरस्कार आमच्या सर्व सदस्यांसाठी प्रेरणादायी असून भविष्यात अधिक जोमाने आणि संघटितपणे पर्यावरण संवर्धनाचे कार्य पुढे नेण्याची ऊर्जा देणारा आहे.’’ तसेच, संस्थेच्या कार्याची दखल घेऊन सन्मानित केल्याबद्दल रंगकर्मी साहित्य क्रीडा कला प्रतिष्ठान उदगीर यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

या राज्यस्तरीय सन्मानामुळे ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनच्या कार्याला नवे बळ मिळाले असून, पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला व्यापक जनसमर्थन मिळण्यासही हातभार लागणार आहे. लातूर शहराच्या हरित परिवर्तनाची ही वाटचाल आता अधिक वेगाने आणि व्यापक स्तरावर पुढे जाईल, असा विश्वास बोलून दाखवला जात आहे.

# जयक्रांती महाविद्यालयात सी. व्ही. रामन जयंतीनिमित्त अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी :** सी. व्ही. रामन यांच्या जयंतीनिमित्त लातूर येथील जय क्रांती वरीष्ठ महाविद्यालयात विज्ञान विभागाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनकार्याची आणि संशोधनाची सविस्तर माहिती देण्यात आली.

प्रारंभी सी. व्ही. रामन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विज्ञान विभागाचे समन्वयक प्रा.विश्वेश बेटकर यांनी रामन यांच्या संशोधनकार्याविषयी माहिती देताना सांगितले की, २८ फेब्रुवारी १९२८ रोजी त्यांनी ‘‘रामन इफेक्ट’’ या महत्त्वपूर्ण शोधाची घोषणा केली. प्रकाश एखाद्या पारदर्शक माध्यमातून जात असताना त्याच्या तरंगलांबीमध्ये होणारा बदल म्हणजेच ‘रामन परिणाम’ होय. या शोधामुळे पदार्थांची अंतर्गत रचना समजून घेण्यास मोठी मदत झाली. पृथ्वी आकाशातून निळी का दिसते, या प्रश्नामागील प्रकाशाच्या विखुरण्याचा वैज्ञानिक पाया समजावून सांगण्यात त्यांच्या संशोधनाचा मोठा वाटा आहे.

या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना १९३० साली भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला. विज्ञान क्षेत्रातील हा मानाचा जागतिक पुरस्कार मिळवणारे ते पहिले भारतीय वैज्ञानिक ठरले. त्यांच्या जयंतीनिमित्त २८ फेब्रुवारी हा दिवस देशभर ‘‘राष्ट्रीय विज्ञान दिन’’ म्हणून साजरा केला जातो.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. श्रीधर कोल्हे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आणि संशोधनाची आवड निर्माण करण्याचे आवाहन केले. ‘‘सी. व्ही. रामन यांसारख्या महान वैज्ञानिकांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन नव्या पिढीने विज्ञान क्षेत्रात भरीव कामगिरी करावी,’’ असे ते म्हणाले.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पल्लवी भिंगे यांनी मानले. कार्यक्रम उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# आलमला येथील ब्ल्यू बर्ड स्कूलच्या बाल शास्त्रज्ञांनी विज्ञानातून मांडली, प्रगतीची नवी क्षितीजे !

**औसा/प्रतिनिधी :** तालुक्यातील आलमला येथील ब्लू बर्ड इंटरनॅशनल स्कूल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण करणे व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महान भारतीय शास्त्रज्ञ डॉ.सी.व्ही. रमण यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या संशोधन कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देऊन विज्ञान क्षेत्रातील योगदानाविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले.

शाळेचा मुख्याध्यापिका स्वाती कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रात संशोधनाची आवड निर्माण करण्याचे आवाहन केले तसेच जिज्ञासा निरीक्षण व प्रयोगशीलता या गुणांचा विकास करण्याचा संदेश दिला. यानंतर विज्ञान विभाग प्रमुख फिरदोस सय्यद यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी शंभरहून अधिक विज्ञान प्रकल्प व मॉडेल्स सादर केले सौर ऊर्जा,पर्यावरण संवर्धन,जलसंवर्धन,रोबोटिक्स तसेच विविध विज्ञान प्रयोग या विषयावरील प्रकल्पांनी उपस्थिताचे विशेष लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रात्यक्षिकांमुळे कार्यक्रम अधिक आकर्षक ठरला या कार्यक्रमाला पालकांचा भरगोस प्रतिसाद मिळाला. या विज्ञान प्रदर्शनामध्ये पहिले ते चौथी या वयोगटातून पृथ्वीराज प्रदीप शिंदे प्रथम, स्वराली विकास मुगळे द्वितीय तर आरुष सुरेश गवळी व आदर्श हंसराज पाटील तृतीय आले. त्यानंतर पाचवी ते आठवी या वयोगटातून शाहिद अब्दुल हमीद मूलानी प्रथम यश लक्ष्मण गायकवाड द्वितीय तर क्रांतीसिंग अमरसिंग हजारी तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.



संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवेश्वर धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्वेश्वरया इन्स्टिटयूट ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेजचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, योगेश धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी.फार्मसी चे प्राचार्य डॉ.कैलास कापसे, विभाग प्रमुख रेवणसिद्ध बुक्का, प्रा. प्रवीण साबदे प्रा. अंकुश बिडवे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांच्या तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व परिश्रमाचे कौतुक करून अभिनंदन केले.

सदरील विज्ञान प्रदर्शनामध्ये परीक्षक म्हणून प्रा.संदेश माडे प्रा.अंकुश बिडवे प्रा. प्रवीण साबदे व प्रा. धीरज सुगरे हे कार्यरत होते. राष्ट्रीय विज्ञान दिन यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक विनोद पांडुळे, मंजूर पाशा शेख, सोहेल शेख, सौरभ वडे, तानाजी जाधव, फिरदोस सय्यद, नीतू भंडारी, परमेश्वर चिलखे, रश्मी दुधनकर, गीता चव्हाण, सुप्रिया जाधव, पायल घायाळ, ममता बोकडे, श्रीदेवी कवठे तसेच दीपक खोजे, शरद साळुंके, महारुद्र जवादे महम्मद मुलानी, सतीश निलंगेकर, नौशाद फकीर व आशा राठोड यांनी अथक परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय मूल्यांकन समितीची भाटशिरपुरा प्राथमिक शाळेला भेट; ‘नंदनवन’ घडविल्याचे गौरवोद्गार

**कळंब/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री ‘माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानांतर्गत लातूर शिक्षण विभागातून प्रथम क्रमांक पटकावलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपुरा येथे राज्यस्तरीय मूल्यांकन समितीने भेट देऊन सखोल पाहणी केली. निकषानुसार शाळेच्या सर्व बाबींचे परीक्षण करण्यात आले.

राज्याच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रमुख तथा मूल्यांकन समितीचे प्रमुख शरद गोसावी (प्राथमिक शिक्षण संचालक, पुणे) यांच्या नेतृत्वाखाली समितीने शाळेची गुणवत्ता, भौतिक सुविधा, शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची क्षमताधिष्ठित प्रगती यांचा आढावा घेतला. समितीत विभागीय उपसंचालक डॉ. गणपत मोरे (पुणे), जिल्हा परिषद अकोला येथील प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंह पवार, सदस्य सचिव (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला) वरिष्ठ अधिव्याख्याता अंकुश ससाने तसेच नगरपरिषद वाशिमचे प्रशासन अधिकारी नंदकिशोर मिटकरी यांचा समावेश होता.

यावेळी धाराशिवचे माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती किशोरी जोशी, संभाजी जगदाळे आदी उपस्थित होते.

समितीने प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली. शाळेतील अद्ययावत सुविधा, स्वच्छ व सुबक परिसर, शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने आणि उपक्रमशील वातावरण पाहून समितीने समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी प्रमुख शरद गोसावी म्हणाले, भाटशिरपुरा शाळा गेल्या तीन वर्षांपासून विभागात प्रथम क्रमांक मिळवत आहे. मुख्याध्यापक, शिक्षक आणि ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून येथे खऱ्या अर्थाने नंदनवन निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील ही शाळा इतरांसाठी आदर्श ठरावी अशीच आहे. येथे विद्यार्थी आत्मविश्वासपूर्ण व क्षमताधिष्ठित शिक्षण घेत आहेत.

शाळेच्या गुणवत्तावृद्धीसाठी श्रीकांत तांबारे, सचिन तामाने, अमोल बाभळे, नागेंद्र होसाळे, श्रीमती कालींदा मुंडे, लिंबराज सुरवसे, राजभाऊ शिंदे, श्रीमती राजकन्या तोडकर, परमेश्वर वाघमोडे, गणपत तपिसे आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

समितीच्या स्वागतासाठी विद्यार्थ्यांनी लेझीम, बुलबुल संचालन व स्वागतगीत सादर केले. इयत्ता सातवीतील कु. समृद्धी गायकवाड व सहकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक तथा गोविंदपुर केंद्रप्रमुख बाळकृष्ण तांबारे यांनी केले. सूत्रसंचालन कु. आनम शेख, कु. संध्या जाधव व कु. प्रणाली खाते यांनी केले, तर आभार कु. समृद्धी गायकवाड हिने मानले. शेवटी सर्व मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# संत मदर तेरेसा माध्यमिक विद्यालयचा महेश वाघमारे तालुक्यात पहिला ! NMMS परीक्षेत घवघवीत

कळंब (प्रतिनिधी)- संत मदर तेरेसा माध्यमिक विद्यालय, ता. कळंब जि. धाराशिव या विद्यालयाने छचचड २०२५ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. एकूण ३४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी तब्बल २९ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

या यशामुळे विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून विद्यार्थी, पालक व शिक्षकवर्गामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या प्रमाणे गुणवंत विद्यार्थ्यांची

यश महेश वाघमारे, देवयानी दत्ता पवार, अक्षरा दत्ता इके, आर्या दिपक धावरे, पंकजा गजेंद्र जवंजाळ, श्रेया बालाजी गुंड, श्रीलेश मधुकर बाकले, विराज विजयकुमार मस्के, सुहान लतीफ शेख, समर्थ विलास डिकले, श्रद्धा सुदर्शन कोळपे, यशवर्धन दत्ता शेवडे, रूही बोद्धीसत्व वाघमारे, गायत्री संतोष पुरी, प्रांजली नामदेव झाडे, मयंक संजीवन सरवदे,देव उमेश शिंदे, ऋतुराज ज्ञानेश्वर गायकवाड,समृद्धी शंकर डोळे, सार्थक कल्याण कांबळे, सौरभ समाधान कोठावळे, अश्विन अविनाश कांबळे, अस्मिता सतीश काळे, संस्कृती धर्मराज काळे, अंकिता अरुण माळी, रुद्रप्रताप सुरेश शिंदे, सृष्टी दत्तात्रय तनपुरे,

सुबोध अश्रूबा राऊत, सोनाक्षी दीपक धावारे, या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे प्रमुख श्री. अंगदराव चव्हाण साहेब, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. पी. ए. चव्हाण सर, सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ व पालक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा पाठिंबा यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची त्रैमासिक बैठक १० मार्च रोजी तक्रार सादरीकरणासाठी कार्यपद्धती जाहीर

धाराशिव दि.२ मार्च (जिमाका) जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती,धाराशिवची माहे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ या कालावधीतील त्रैमासिक बैठक दिनांक १० मार्च २०२६ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथील सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे.

जनतेच्या तक्रारी किंवा अभिकथने पुराव्यासह सादर करावयाची असल्यास संबंधित अधिकारी ज्या तालुक्यात कार्यरत आहे,त्या तालुक्यातील तालुकास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे तक्रार सादर करता येईल. जर संबंधित विभागाने किंवा तालुकास्तरीय समितीने कार्यवाही केली नसल्यास तक्रारदारास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे अर्ज सादर करण्याची मुभा आहे.याबाबत सर्व कार्यालय प्रमुख,अशासकीय सदस्य व सर्व जनतेने नोंद घ्यावी.

शासन परिपत्रक ४ फेब्रुवारी २०११ मधील परिच्छेदानुसार जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे.जिल्ह्यातील प्रत्येक प्रशासकीय विभागाने जिल्हा हा घटक मानून जिल्ह्यातील वरिष्ठतम अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा दक्षता समिती गठित केलेली आहे.प्रथमतः तक्रारदाराने तक्रार संबंधित गठित समितीकडे दाखल करावी.

माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्रोतांद्वारे शासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार,गैरव्यवहार किंवा अफरातफर केल्याचे पुरावे उपलब्ध असल्यास संबंधित अधिकारी ज्या तालुक्यात कार्यरत आहे,त्या तालुक्यातील भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे तक्रार सादर करता येईल.

भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारी व सोबतच्या पुराव्यांमध्ये तथ्य आढळल्यास ३० दिवसांच्या आत सदर तक्रार व पुरावे तपासून संबंधित कार्यालयाच्या परिच्छेद ८ नुसार गठित केलेल्या जिल्हा दक्षता समितीकडे पाठविण्यात येतील.उपरोक्त 'अ' व 'ब' नुसार प्राप्त झालेल्या तक्रारींच्या संदर्भात परिच्छेद ८ नुसार गठित जिल्हा दक्षता समितीने ९० दिवसांच्या आत निर्णय घ्यावा. संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी सकृतदर्शनी दोषी आढळल्यास त्याबाबत शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्यात येईल. जिल्हास्तरीय दक्षता समितीकडे पाठविण्यात आलेल्या तक्रारींवर ९० दिवसांच्या कालावधीत निर्णय झाला नाही,तर तक्रारदारास आपली तक्रार पुराव्यासह जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे सादर करता येईल.

जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे अर्ज सादर करताना तक्रारदाराने तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे सादर केलेल्या तक्रार अर्जाची छायाप्रत व पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी निर्धारित कार्यपद्धतीनुसार तक्रारी सादर कराव्यात,असे आवाहन करण्यात आले आहे.

# धाराशिवमध्ये नाही एकही सार्वजनिक स्वच्छतागृह: महिलांची होतेय कुचंबना

धाराशिव (प्रतिनिधी)- नगराध्यक्षा, मुख्याधिकारी आणि २१ नगरसेविकाअसे शहरात महिलाराज असतानाही महिलांनाच स्वच्छतागृहा अभावी कुचंबना सहन करण्याची वेळ आली आहे. शहरात एकही सार्वजनिकस्वच्छतागृह नसल्यामुळे शहरातील व येथे विविधकामानिमित्त येणाऱ्या महिलांना मोठा त्रास होतअसून गेल्या १५ वर्षांपासून अशीच परिस्थिती आहे. दोन ते तीन वर्षांपूर्वी स्वच्छ अभियानातून ६४ लाखांचा निधी उपलब्ध झाला होता. मात्र,जागेसाठी नागरिकांचा विरोध झाल्यामुळे नवीन स्वच्छतागृहांचे बांधकाम होऊ शकले नाही. शहरातील लोकसंख्येने जवळपास दीड लाखाचा टप्पा पार केला आहे. आता शहरात शैक्षणिक वातावरण निर्माण झाल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे शिक्षणासाठी शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. अशा परिस्थितीत शहराचा विस्तार झपाट्याने वाढत आहे. मात्र,मूलभूत सोयी-सुविधा सक्षमपणे राबवल्या जात नसल्यामुळे सर्वच नागरिकांना गैरसोय सहनकरावी लागत आहे. शहरामध्ये अनेक समस्याकायम आहेत. यामध्ये, प्रामुख्याने सार्वजनिक स्वच्छतागृहाची समस्या गेल्या १५ वर्षांपासून सतावत आहे. सर्व स्तरातील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

# कोरोना विम्याचे दीड लाख व्याजासह देण्याचे आदेश

कळंब (प्रतिनिधी)- - कोरोना रक्षक विमा पॉलिसी असतानाही उपचार खर्चाची रक्कम नाकारल्याप्रकरणी ग्राहक मंचाने विमा कंपनीला चांगलाच दणका दिला आहे. संबंधित ग्राहकाला मूळ विमा रक्कम सुमारे दीड लाख रुपये ९ टक्के व्याजासह अदा करावी, तसेच मानसिक त्रास व तक्रार खर्चापोटी २० हजार रुपये अतिरिक्त द्यावेत, असा आदेश देण्यात आला आहे.

कळंब येथील रहिवासी हर्षद अंबुरे यांनी ३० जुलै २०२० रोजी चोलामंडलम कंपनीची 'कोरोना रक्षक' पॉलिसी घेतली होती. पॉलिसी कालावधीत त्यांना कोरोनाची लागण झाली. प्रकृती बिघडल्याने बार्शी येथील खासगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागले. उपचारानंतर त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह विमा दावा सादर केला. मात्र, दवाखान्यात दाखल होऊन उपचार घेण्याची गरज नव्हती, असा दावा करत कंपनीने विमा रक्कम नाकारली.

यामुळे अंबुरे यांनी लातूर येथील ग्राहक मंचाकडे धाव घेत तक्रार दाखल केली. विमा कंपनीशी केलेला पत्रव्यवहार, वैद्यकीय अहवाल व उपचार खर्चाची कागदपत्रे त्यांनी मंचासमोर सादर केली. सुनावणीदरम्यान विमा कंपनीने समाधानकारक उत्तर न दिल्याचे स्पष्ट झाले.

प्रकरणातील तथ्यांचा विचार करून ग्राहक मंचाचे अध्यक्ष व सदस्यांनी विमा कंपनीची भूमिका ग्राह्य धरली नाही. दीड लाख रुपयांची विमा रक्कम तक्रार दाखल केल्यापासून ९ टक्के व्याजासह ४५ दिवसांच्या आत अदा करावी, तसेच मानसिक त्रास व तक्रार खर्चापोटी २० हजार रुपये द्यावेत, असा आदेश मंचाने दिला.

या प्रकरणात अंबुरे यांच्यावतीने ॲड. अनिल जवळकर यांनी काम पाहिले. ग्राहकांच्या हक्कांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

# गावोगावी आरोग्य क्रांतीचा संकल्प ; गुणवंत ग्रामपंचायतींना २ कोटींपर्यंतचा सन्मान

धाराशिव (जिमाका) 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियान राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.दर आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार असून,गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना 'आरोग्य संपन्न ग्राम' म्हणून मानांकन देऊन प्रोत्साहनपर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

आरोग्य सेवांमध्ये गुणात्मक सुधारणा करणे,प्रत्येक नागरिकाला आरोग्याच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे,संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करून त्यांचे निर्मूलन करणे तसेच माता व बालकांचे आरोग्यमान उंचावणे या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येणार आहे. नागरिकांच्या जीवनशैलीत व आहारात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रोत्साहन, प्रतिबंधात्मक उपाययोजना,वेळेवर उपचार व पुनर्वसन हे या अभियानाचे चार प्रमुख स्तंभ असतील.

गावातील नागरिकांना सदृढ व सशक्त करण्यासाठी हे अभियान सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अंमलबजावणीत आरोग्य उपकेंद्र,प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय हे प्रमुख घटक असतील. सामाजिक बांधिलकी,लोकसहभाग, लोककेंद्रीत नियोजन व शाश्वत आरोग्य व्यवस्थापनाच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.या माध्यमातून आयुष्मान भारत,राष्ट्रीय आरोग्य अभियान,पोषण अभियान, स्वच्छ भारत अभियान तसेच सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स-३ यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

अभियानात स्थानिक स्वराज्य संस्था,जिल्हा व तालुका यंत्रणा, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांवरील आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक-सेविका,आशा कार्यकर्त्या तसेच ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग राहणार आहे.एकात्मिक कार्यप्रणाली व पारदर्शक मूल्यांकनाच्या आधारे गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना 'आरोग्य संपन्न ग्राम' पुरस्कार देण्यात येणार आहे.

अभियानाच्या अंमलबजावणी व नियंत्रणासाठी आरोग्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य आरोग्य संपन्न गाव नियंत्रण समिती,राज्यस्तरीय कृती समिती,जिल्हास्तरीय अभियान समिती,तालुकास्तरीय कृती समिती आणि ग्रामपंचायतस्तरीय कृती समिती अशा पाच समित्यांची स्थापना करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतस्तरीय समिती गाव आरोग्य कृती आराखडा तयार करेल. त्यामध्ये आरोग्य सेवांची सद्यस्थिती, अडचणी व सुधारणा उपाय,आरोग्य ग्रामसभा,स्वच्छता अभियान,पोषण जागरूकता,स्वमूल्यमापन चाचणी, आरोग्य नकाशे तसेच विविध कार्यक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे यांचा समावेश असेल.

गावांचे स्वमूल्यमापन ते राज्यस्तरीय अंतिम मूल्यांकन अशी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.प्रथम क्रमांकासाठी जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर अनुक्रमे २५ लाख,१ कोटी व ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जातील. द्वितीय क्रमांकासाठी २० लाख,७५ लाख व ३ कोटी,तर तृतीय क्रमांकासाठी १५ लाख,५० लाख व २ कोटी रुपयांचे पुरस्कार असतील.

उपआरोग्य केंद्राला जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५ लाख व राज्यस्तरावर २५ लाख रुपये देण्यात येतील. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी १० लाख व राज्यस्तरावर ५० लाख रुपये तर ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयाला राज्यस्तरावर ७५ लाख रुपयांचा पुरस्कार दिला जाईल.

याशिवाय पंचायत समितीला राज्यस्तरावर अनुक्रमे २ कोटी,दीड कोटी व १ कोटी २५ लाख रुपये तर जिल्हा परिषदेला अनुक्रमे ५ कोटी, ३ कोटी व २ कोटी रुपयांचे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.या अभियानासाठी दरवर्षी ८० कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

# ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे विविध कृषी पुरस्कारांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

धाराशिव (जिमाका) महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न,वसंतराव नाईक कृषिभूषण,जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र,वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती),युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे.हे पुरस्कार माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते.

प्रस्ताव तयार करण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते.या पारंपरिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता.या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ही प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) 'कृषी पुरस्कार' या टॅबमध्ये उपलब्ध आहे.

या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण,तपासणी,मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे.यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता,विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे.

ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहेत. ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलद गतीने होणार आहे. एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा-पुन्हा सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.अर्ज कोणत्या टप्प्यावर आहे याची माहिती शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होणार आहे.छपाई, झेरॉक्स,प्रवास व पोस्ट खर्च कमी होऊन आर्थिक भार कमी होणार आहे.

आयुक्त,कृषी विभाग,पुणे यांनी इच्छुक शेतकरी/व्यक्ती/संस्था/गट यांनी सन २०२५ पासूनच्या विविध कृषी पुरस्कारांसाठी अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करावेत, असे आवाहन केले आहे.तरी इच्छुकांनी तात्काळ आपला अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,धाराशिव यांनी कळविले आहे.

# उमरग्यात कचऱ्याचे ढीग, गटारी तुंबल्या, दुर्गंधीने नागरिक त्रस्त

उमरगा शहरातील अंतर्गत भागात अनेक ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले असून, तुंबलेल्या गटारीचे दुर्गंधीयुक्त घाण पाणी मुख्य रस्त्याच्या बाजूने साचत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला झाला आहे. पालिका लाखो रुपये खर्च करूनही सर्वत्र अस्वच्छता आहे.

उमरगा नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे शहरातील अनेक भागात आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. दुर्गंधीयुक्त गटारीचे पाणी रस्त्यावर आल्याने आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी पसरली आहे. सर्वत्र साचलेले घाणीचे साम्राज्य, तुंबलेल्या गटारी यामुळे शहरात डासांचे व डुक्करांचे प्रमाण वाढले आहे. पालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. घनकचरा व्यवस्थापणावर महिन्याकाठी जवळपास २० लाख रुपये खर्च करूनही शहरात घाणीचे साम्राज्य पसरल्याने त्यामुळे होत असलेला खर्च वाया जात असल्याचे दिसते. रविवारी राष्ट्रीय महामार्गावरील पोलिस स्टेशनच्या समोरील बाजूस दर रविवारी आठवडा बाजार भरतो. या ठिकाणी गटारीचे पाणी रस्त्यावर आल्याने नागरिकांना नाईलाजाने घाण ठिकाणीचा भाजीपाला खरेदी करावा लागत आहे. वाढत्या अस्वच्छतेमुळे डुकरांच्या झुंडी फिरत आहेत. डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात मुख्य रस्त्याच्या बाजूला काचऱ्याचे ढीग कायम असतात. हा शहरातील मुख्य बाजारपेठेतील मुख्य भाग असून, या ठिकाणी नेहमी दुर्गंधी पसरलेली असते. शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग वारंवार दिसून येतात. या कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे येथे मोकाट कुत्र्याचा व डुकराचा नेहमी वावर असतो.

घनकचरा व्यवस्थापनावर शासन लाखो रुपये खर्च करत असते. परंतु उमरगा शहरातील साफसफाई मात्र देखव्यापुरतीच केली जाते.


लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649